। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २१८ वा । मंगळवार दिनांक ११ नोव्हेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### सोन्याचे दागीने व रोख रक्कमेची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत राहुल रा. नळदुर्ग, सुशिल राठोड रा. नळदुर्ग व इतर ४ इसम यांनी दि. ०७.११.२०२५ रोजी दिशा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत धाराशिव, शाखा नळदुर्ग शाखेतील मुख्ये शटरचे लॉक चावीने उघडून आत प्रवेश करुन तिजोरीतील ४ किलो ७६२ ग्रॅम ६७९ मिलीग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने अंदाजे २,६१,४२,०२७ व रोख रक्कम २,२१,२४५ असा एकुण २,६३,६३,२७२ किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- उमेश भानुदास जाधव, वय ४४ वर्षे, व्यवसाय- शाखा व्यवस्थापक दिशा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत धाराशिव, शाखा नळदुर्ग रा.गवळी गल्ली नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०९.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३१६(५),३३१(४), ३०५, ६१(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध मद्य विरोधी कारवाई गुन्हे दाखल

भुम(प्रतिनिधी)- पोलीस ठाण अंतर्गत पुजा रा.कोष्टी गल्ली भुम ता. भुम जि. धाराशिव या दि.०९.११.२०२५ रोजी कोष्टी गल्ली भुम येथे अंदाजे १,००० किंमतीची १०लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर स्वाती रा. इंदीरानगर पारधी पीडी भुम ता. भुम जि. धाराशिव या दि.०९.११.२०२५ रोजी इंदीरानगर भुम येथे अंदाजे १,००० किंमतीची १० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द २ गुन्हे नोंदविले आहेत.

तसेच बेंबळी पोलीस ठाणे अंतर्गत शोभा , रा. मेडसिंगा ता. जि. धाराशिव या दि.०९.११.२०२५ रोजी आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे २,२०० किंमतीची २० लिटर गावठी दारु व कॅन्ड अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये बेंबळी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत गणेश रा. कौडगाव ता. जि. धाराशिव हे दि.०९.११.२०२५ रोजी कौडगाव येथील बार्शी रोड कौडगाव तांडा बस थांबा जवळील बाजूचे पत्राचे शेडसमोर अंदाजे २,६७० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ४२ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.या सर्व प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## भूम, परंडा तालुक्यात पूरग्रस्तांना ४०० किट वाटप



परंडा(प्रतिनिधी)- समाजाप्रती उत्तरदायित्वाची जाणीव जपत मुंबईतील महानगर गॅस लिमिटेड यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत व सेवा सहयोग फाउंडेशन मुंबईच्या विद्यमाने भूम व परंडा तालुक्यातील ४०० पूरबाधित कुटुंबांना धान्य किटचे वाटप करण्यात आले. परंड्यातील साळुंके मंगल कार्यालयात पार पडलेल्या या उपक्रमात पूरग्रस्त कुटुंबांना दिलासा मिळाला.

सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे भूम व परंडा परिसरातील शेतकऱ्यांचे व नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या आपत्तीग्रस्त कुटुंबांना मदतीचा हात देण्यासाठी सेवा सहयोग फाउंडेशनने पुढाकार घेतला. त्यांच्या आवाहनास प्रतिसाद देत मुंबईच्या महानगर गॅस लिमिटेडकडून धान्य किटसाठी तब्बल २० लाख रुपयांचा निधी सेवा सहयोग फाउंडेशनकडे सुपूर्द केला होता. या निधीतून एकूण १००० कुटुंबांना धान्य किटचे वाटप केले असून, परंड्यातील टप्प्यात ४०० कुटुंबांना मदत पोहोचवण्यात आली.

प्रत्येक किटमध्ये आटा ५ किलो, तांदूळ ५ किलो, साखर २ किलो, चहा पावडर ५०० ग्रॅम, मसाला ५०० ग्रॅम, हळद, टाटा मीठ पुडा, तूरडाळ, मूगडाळ, मसूर डाळ, मूग, मटकी, चवळी प्रत्येकी १ किलो आणि जेमिनी तेलाच्या दोन पिशव्या असा समृद्ध संच देण्यात आला. विनोद सुरवसे यांनी वाटपाचे नियोजन करत भूम, परंडा तालुक्यातील २० गावांतील पूरग्रस्त कुटुंबांपर्यंत ही मदत वेळेत व सन्मानाने पोहोचवली.

मदत वितरण कार्यक्रमास महानगर गॅस लिमिटेडतर्फे रोहित बाहेती, सागर गव्हाणे, निवृत्ती गुंडाळे, अक्षय कुचेकर, अमन अली मीर, सचिन गव्हाणे उपस्थित होते.

तर सेवा सहयोग फाउंडेशनतर्फे विनोद सुरवसे व श्रीराम केसकर उपस्थित राहून वाटपाची जबाबदारी पार पाडली.

## डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना मदरसांकडून १४ नोव्हेंबरपर्यंत अनुदान प्रस्ताव मागविले

धाराशिव (जिमाका)- अल्पसंख्यांक विकास विभागाकडून मदरसांच्या आधुनिकीकरणासाठी डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना कार्यरत आहे.या योजनेंतर्गत पात्र मदरसांची शासनास अनुदानाकरिता शिफारस करण्यासाठी जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

अल्पसंख्यांक विकास विभागाच्या दि.११ ऑक्टोबर २०१३ च्या शासन निर्णयातील विहीत निकषांनुसार,ही योजना सन २०२५-२६ या वर्षासाठी जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे.

त्यानुषंगाने,या योजनेंतर्गत सन २०२५-२६ या वर्षासाठी अनुदान मिळवू इच्छिणाऱ्या जिल्ह्यातील मदरसांनी जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांचेकडे दि.१४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत विहीत नमुन्यातील प्रस्ताव सादर करावेत.

सद्यस्थितीत या योजनेंतर्गत मदरसांना प्रस्ताव सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे मुदत देण्यात आली आहे.

त्यानुसार,नमूद दिनांकापूर्वी जिल्ह्यातील सर्व मदरसांनी आपले प्रस्ताव विहीत नमुन्यात १४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव येथे सादर करावेत.

## कळंब शहरात पादुका पूजन व प्रवचन दर्शन सोहळा संपन्न! शेकडो भक्तगणांनी घेतले पादुकाचे दर्शन



कळंब (प्रतिनिधी)- जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांचा पादुका दर्शन व प्रवचन सोहळा रविवार , दि . ९ नोहेंबर रोजी सकाळी १० वाजता शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयाच्या डिकसळ येथील क्रीडा संकुलाच्या मैदानावर संपन्न झाला असून जिल्ह्यातील हजारो भाविक-भक्तांनी या सोहळ्यास लाभ घेतला .

सकाळी १० वाजता कळंब शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणाहून भव्य-दिव्य शोभायात्रेची सुरुवात झाली. या मिरवणुकी मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा देखावा, राष्ट्रमाता जिजामाता यांचा देखावा, झाशीची राणी देखावा, स्वामी विवेकानंद यांचा देखावा, लेझीम पथक, ढोल पथक, कलशधारी महिला ,निशानधारी महिला पुरुष, भजनी मंडळ , संबळ पथकासह सहभागी झाले होते . जगद्गुरुश्रींचे नामघोष करत रथातुन जगद्गुरुश्रींच्या सिद्धपादुका व प्रतिमेची मिरवणूक सकाळी १० वाजता सुरू झाली होती .

कार्यक्रमाच्या ठिकाणी शोभायात्रा पोहोचल्यावर तेथे प्रथम जगद्गुरूश्रींच्या सिद्ध पादुका पूजन , व त्यानंतर सामाजिक उपक्रम अंतर्गत जिल्ह्यातील निराधार विधवा आर्थिक दुर्बल घटकातील गरजवंत महिलांना सामाजिक उपक्रमात अंतर्गत ४३ महिलांना शिवण यंत्राचे मान्यवरांच्या हस्ते मोफत वाटप करण्यात आले . यावेळी व्यासपीठावर डिकसळ ग्रामपंचायत सरपंच पुष्पाताई धाकतोडे, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे, शिवसेनेचे अजित पिंगळे, भाजपाचे तालुकाध्यक्ष अरुण चौधरी, दत्ता साळुंखे, मीनाक्षी भवर, अनंत वाघमारे, राहुल चव्हाण, विकास कदम ,अनंत बोराडे, संजय अडसूळ, शितल चोंदे, इमरान मुल्ला, भैय्या खंडागळे, समीर सय्यद, संतोष कस्पटे,सुनील गायकवाड,संजय मुंदडा, सागर मुंडे या सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

जिल्ह्यातुन जवळपास १५ ते १६ हजार भाविक भक्तांनी या पादुका दर्शन घेतले. सभामंडपात एक हजाराहून अधिक गुरुपूजनासाठी भक्त बसले होते तर उपासक दीक्षासाठी साधारणतः ६०० भक्तगण सपत्नीकदीक्षा घेण्यासाठी बस ले होते, यावेळी श्वेता जोशी यांचे यावेळी प्रवचन झाले. त्यानंतर भक्त दिक्षा व पादुका दर्शन सपन्न झाले. सोहळ्याची सांगता पादुकेवरती पुष्पवृष्टी करुण झाली .

कार्यक्रम स्थळी महाप्रसाद व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती . तर या कार्यक्रमासाठी पादुका दौरा प्रमुख समदे आप्पा, मराठवाडा पीठ प्रमुख विजय देशपांडे ,आध्यात्मिक प्रमुख महेश रोमन ,जिल्हानिरिक्षक दत्ता घरत , जिल्हा सेवा समितीचे जिल्हाध्यक्ष संतोष केसकर,उत्सव समितीचे अध्यक्ष कल्याण बोराडे , कळंब तालुकाध्यक्ष विठ्ठल काटे,बाळासाहेब व्होंडे, जिल्हा कर्नल शंकर कांबळे, विजय भारती , राजाभाऊ मुळीक, कल्याण बोराडे, जीवन चव्हाण , दिनकर डोंगरे, बाळासाहेब कानडे, गंगाधर ढवळे, प्रतिक जरंगे, महेश मुरगे ,प्रवीण खंडागळे, उमाताई गुंठाळ, मीरा माळी, जयश्री ढवळे, रमेश शिंदे, प्रदीप जाधवर, ज्योती पवार, सहयोग्यता ताई अंधारे, श्रीजीत इंगळे, आकाश जाधव, लक्ष्मी माने, प्रदीप जाधवर, शिवाजी ढवळे, अनंत शेळके,राजेंद्र मुळीक, भारत शेळके, रमेश शिंदे, स्वप्निल खिंडकर, जीवन चव्हाण, भास्कर जाधव, पांडुरंग गव्हाणे, शिवाजी सारुक सहआधी नी परिश्रम घेतले तसेच उमरगा, लोहारा, तुळजापूर, कळंब, भूम, परंडा, वाशी या तालुक्याचे तालुकाध्यक्ष, जिल्ह्यातील सर्व आरती प्रमुख, सत्संग प्रमुख या कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले आहे .

## आपले सरकार सेवा केंद्र मंजुरी प्रक्रियेची छाननी सुरू

### अर्जदारांनी भूलथापांना बळी पडू नये - जिल्हा प्रशासनाचा इशारा

धाराशिव, (जिमाका) -जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव यांच्याकडून जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिपत्याखालील रिक्त 'आपले सरकार सेवा केंद्र' मंजुरीसंदर्भात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.त्यानुसार, दिनांक ०३/०९/२०२५ ते १५/०९/२०२५ या कालावधीत इच्छुकांकडून अर्ज मागविण्यात आले होते.

सदर प्राप्त अर्जांची यादी दिनांक ३०/०९/२०२५ रोजी जिल्हा संकेतस्थळावर https://dharashiv.maharashtra.gov.in/ वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सध्या प्राप्त अर्जांची छाननीची कार्यवाही सुरू असून,या छाननीनंतर पात्र व अपात्र अर्जदारांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. पात्र/अपात्र यादीवर आक्षेप नोंदविण्यासाठी मुदत देण्यात येईल. या कालावधीत इच्छुक अर्जदारांना आपले सरकार पोर्टलवरून किंवा निर्धारित माध्यमातून आक्षेप नोंदविता येतील.

प्राप्त आक्षेपांवर नियमांनुसार कार्यवाही करून,त्यांचे परीक्षण झाल्यानंतर पात्र अर्जांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येईल. अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर 'आपले सरकार सेवा केंद्र' मंजुरीची कार्यवाही शासन निर्णयानुसार,गुणवत्तेच्या आधारे आणि संपूर्ण पारदर्शक पद्धतीने करण्यात येणार आहे.

तसेच,वरील सर्व प्रक्रियेबाबतची अद्ययावत माहिती वेळोवेळी जिल्हा संकेतस्थळावर https://dharashiv.maharashtra.gov.in प्रसिद्ध केली जाणार आहे.जिल्हा प्रशासनाने अर्जदारांना कोणत्याही भूलथापांना किंवा आमिषांना बळी न पडण्याचे आवाहन केले आहे.

## ब्राह्मण कल्याण ट्रस्टच्यावतीने आयोजित रक्तदान शिबीरात ५१ दात्यांचे रक्तदान



धाराशिव (प्रतिनिधी)-येथील ब्राह्मण कल्याण ट्रस्ट, धाराशिव या सामाजिक संघटनेच्या वतीने आयोजित रक्तदान शिबीरात शहरातील ५१ दात्यांनी रक्तदान केले.

येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात सध्या रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्याने रक्तदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत येथील ब्राह्मण कल्याण ट्रस्टच्या वतीने शहरातील सिनर्जी इन्फोटेक येथे आज रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत हे रक्तदान शिबीर घेण्यात आले. या रक्तदान शिबीरात शहरातील ५१ दात्यांनी रक्तदान केले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रक्त पेढीच्या वतीने रक्तसंकलन करण्यात आले. शिबीराच्या यशस्वीतेसाठी ब्राह्मण कल्याण ट्रस्टच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

## ३६६ वा शिवप्रताप दिन व समिती स्थापना दिन साजरा



धाराशिव (प्रतिनिधी)-सोमवार दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवच्या वतीने विश्ववंदनीय छत्रपती शिवाजी महाराजांनी विजापुरी सरदार अफजलखान यास ठार मारून मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाचा दिवस म्हणजे ३६६ वा शिवप्रताप दिन मोठ्या उत्साहात व थाटामाटात साजरा करण्यात आला. आज पासून बरोबर ३६६ वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी विजापुरी बादशाहीचे अफजलखान रुपी आलेले संकट प्रतापगडाच्या पायथ्याशी ठार मारून ऐतिहासिक विजय संपादन केला होता. दरवर्षी शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिव या ऐतिहासिक दिनाची स्मृती जागृत व जतन करण्यासाठी हा दिवस शिवप्रताप दिन मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा केला जातो. आजच्याच दिवशी १० नोव्हेंबर २००३ रोजी शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवची मुहूर्तमेढ रोवण्यात आली होती. सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून सतत शिवकार्य करणारी समिती संपूर्ण जिल्हाभर कार्यरत आहे. ३६६ वा शिवप्रताप दिन व शिवराज्याभिषेक सोहळा समिती स्थापना दिन या दोन्हींच्या निमित्ताने आज धाराशिव शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास दुग्धाभिषेक व महाभिषेक समितीचे ज्येष्ठ मार्गदर्शक श्री शशिकांत खुणे, श्री गुंडोपंत जोशी श्री धर्मराज सूर्यवंशी श्री अमोल पवार श्री अच्युत थोरात मेजर श्री धनंजय साळुंके एडवोकेट संजय शिंदे श्री हरिश्चंद्र आगळे श्री हनुमंत तांबे सर श्री दत्ता साळुंके यांचे सह शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत करण्यात आला. शिवरायांचा पुतळा परिसर फुलांनी सजविण्यात आला होता तसेच वाद्यांच्या दणदणाटात व फटाक्यांच्या आतषबाजीने तसेच समितीच्या मावळ्यांच्या गगनभेदी घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिव चे जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील तसेच धाराशिव शहर तालुका परिसरातील आजी-माजी पदाधिकारी व बहुसंख्य कार्यकर्ते मावळे उपस्थित होते.

### १६०० मिटर वायरचे केले नुकसान

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.०८.११.२०२५ रोज घाटनांदुर शिवारातील रिन्यु पॉवर कंपनीच्या गट नं ६८० मधील ३३ केव्ही लाईनचे स्कोडा केबल १६०० मिटर वायर मयुर रा. घाटनांदुर ता. भुम जि.धाराशिव यांनी तोडुन रिन्यु पावर कंपनीचे एकुण ४,२२,४३२ किंमतीचे नुकसान केले. या प्रकरणी अमोल आश्रुबा मोटे, वय ४० वर्षे, रा. गिरवली ता. भुम जि. धाराशिव यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे वाशी येथे गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## पाकिस्तानची घसरत चाललेली परिस्थिती

पाकिस्तान हा देश भारताचा भुभाग घेऊन तयार निर्माण झाला असला तरी भारताएवढी प्रगती करू शकला नाही. उलट सैन्याचे वाढते वर्चस्व पाहाता व राजकारणीच भ्रष्टाचारी असल्याने मोठ्या आर्थिक संकटात सापडला जात आहे. एकीकडे देशात असंतोष वाढत आहे, तर जनता महागाईमुळे त्रस्त दिसून येत आहे. त्यामुळे मुळात सर्वसाधारण जनतेला जगणेच कठिण झाले आहे. तरी सैन्याची राजकारणात वाढती लुडबुड कमी होत नाही. सर्वाधिक भ्रष्टाचार बोकाळला आहे. यात आता नियंत्रण मिळविणे अशक्य वाटत आहे. एकीकडे अतिरेक्याशी संबंध ठेऊन भारताबरोबर संबंध बिघडविले जात आहेत. भारतात वारंवार घुसखोरी केली जात आहे. अतिरेक्यांना प्रशिक्षित करून भारतीय हद्दीत घुसऊन हिंसा घडविली जात आहे. भारताने चोख उत्तर दिले तरी छुप्यामार्गाने भारतातील काहीशी हीतसंबंधामुळे घुसखोरी यशस्वी होत आहे. पहलगाम मधील घटनेनंतर दोघादेशा दरम्यान मतभेद वाढले आहे. भारत पाकिस्तानतील अतिरेक्यांना विरोधात कारवाई चालूच आहे. भारतावर कधी संकट येईल हे सांगता येत नाही. त्याच प्रमाणे पाकिस्तान हा भारतापासून वेगळा झालेला देश असल्याने भारताबरोबर मैत्रीचे संबंध ठेवणे हीतावह आहे. असे जरी असले तरी प्रत्यक्षात भारताविरोधात पाकिस्तानी कृत्यू चालूच आहे. त्यामुळे भारत कदापी गाफील राहू शकत नाही. भारत पाकिस्तानला मदत ही करू शकत नाही. सर्वाधिक त्रास कोणी दिला असेल तर पाकिस्तानने दिला आहे. सर्वाधिक भारतीय जवान शहीद झाले ते पाकिस्तानमुळे हे लक्षात ठेवेल पाहिजे. त्यामुळे पाकिस्तान हा भारताचा कदापी मित्र होवू शकत नाही. भारताविरोधात काम करीत असल्याचे पाकिस्तानची आर्थिकस्थिती बिघडत चालली आहे. पाकिस्तानला अजूनही सुधारण्याची संधी आहे. भारताबरोबर संबंध सुधारले तरच पाकिस्तान हा प्रगती करू शकतो. वरचेवर आर्थिकस्थिती बिघडत चालली आहे ती सुधारली जाऊ शकते. जीवनाश्यक वस्तूचे दर वाढले आहेत, त्यापेक्षा दररोजचे जीवन जगणे कठिण झाले आहे. असे असताना भारताबरोबर वैर व चीन असो किंवा अमेरिकेबरोबर मैत्री करणे एक ना एक दिवस घातक ठरणारे आहे. त्यामुळे भारताने यानंतर ही कितीही पाकिस्ताने विश्वास दाखविला तर तातडीने विश्वास ठेवणे घातक ठरणारे आहे. भारताने त्याच बरोबर गाफील राहाणे परवडणारे नाही. यापुर्वी झोपेतच भारताचा घात झाला आहे. निष्पाप लोकांचे बळी गेले आहेत. अनेक तरणेबांड जवान शहीद झाले आहेत. त्यामुळे पाकवर विश्वास ठेवणे ही सर्वात मोठी चुक ठरणारी आहे. ती चुक अनेकदा भारताने केली आहे. पहलगाम मधील घटना ही भारताची मोठी चुक होती. पकिस्तान हा देश विश्वास घातकी आहे. केवळ हिंदूची हत्त्या करतात यावरून सावध राहाणे योग्य होते. वीषाची परिक्षा किती करावयाची? पाकिस्तान धुर्त व कपटी देश आहे, कारण पकिस्तानी भारतातील त्यांच्या समाजाजील लोकांना आपलेसे करतात. अनेक लालूच दाखवितात. याचा परिणाम जम्मू-काश्मीरातील अनेक हिंदुचे स्थलांतर केले आहे. हिंदुची संख्या पन्नास वर्षापुर्वी होती ती राहीली नाही. हिंदुच्यामनात भीती आहे ती दूर झाली नाही. भारतात आम्ही सर्व भारतीय आहोत यापेक्षा जाती, मत पंथाचा मोठा प्रभाव आहे. त्यामुळे देश तसा विचार केला तर आतून पोखरतो की काय अशी भीती वाटायला लागली आहे. भारत हा देश मोठा आहे. आज किती हिंदू पाकिस्तान मध्ये आहेत. याचा तरी विचार करा. पाकिस्तानात हिंदु समाज सुरक्षित नाही. हे सांगण्याची गरज नाही. अन्याय व अत्याचार भोगत आहे. ही बाब लक्षात घेता भारताने यावर उपाय शोधला पाहिजे. ज्या देशातील जनतेला केवळ हिंसा दिसते तीही हिंसा केवळ भारताविरोधात वापरली जाते अशा देशातील नागरिकांशी संबंध ठेवणे परवडणारे नाही. हिंसेची भाषा ज्यांना केवळ समजते त्यांना प्रेमाची भावना समजाऊन सांगण्याची गरज नाही. मुळात भारताने अनेक चुका केल्या आहेत. त्याचे भोग भारतीय पिढीने भोगले आहेत. मतासाठी शहीदांची किंमत ज्यांना कळाली त्यांनीच हिंसा रोखली. त्यांना शंभरी काठता आली नाही. आपल्या चुका अजूनही त्यांना कळाल्या नाहीत. त्यामुळे आज काय स्थिती आहे ही जनता पाहात आहे. आज काही विचारी लोक म्हणतात भारताला हिंदु राष्ट्र बनवायाचे आहे. मुळात भारताची उभारणी हि हिंदुस्तान म्हणून झाली आहे. हिंदु राष्ट्र आहे परत बनविण्याची गरज नाही. ही बाब लक्षात घेतली पाहिजे. त्यामुळे भारताने गाफील राहू नये. भारताने पाकिस्तानला जशास तसे उत्तर दिले पाहिजे. तरच पाकिस्तान नरमणार आहे. पाकिस्तान हा देश दारिद्र्यात जीवन जगत असला तरी प्रत्यक्षात तो भारताबरोबर द्वेश करणारा एकमेव देश आहे ही बाब दुर्लक्षित करता येत नाही. त्यामुळे भारतीयांनी आता अविचाराने वागणे सोडून दिले पाहिजे. भारताने मजबुत असे संरक्षण केले पाहिजे. भारताने जशासतसे उत्तर दिलेच पाहिजे. असे केले तरच जम्मू-काश्मीरात शांतता राहू शकेल. पाकिस्तानमधील घटनेचे पडसाद भारतात सतत उमटतात. भारतातील अनेकांचे छुपे संबंध पाकमधील नागरिकाशी असण्याची शक्यता आहे. त्यामुळे सतेर्कता सरकारने बाळगावी लागेल त्यापेक्षा नागरिकांनी सुद्धा बाळगावी लागणार आहे. पाकिस्तानाचा उपयोग अमेरिका व अन्य देश भारतात अशांत निर्माण करण्याचा प्रयत्न करू शकतो. चीनही पाकिस्तान उपयोग करून घेऊ शकतो. त्यामुळे अविचारी पाकिस्तान एक ना एक दिवस नकाशावरून दिसणार नाही. ज्यांना केवळ हिंसाच दिसते, मानवता दिसून येत नाही. त्याची कालांतराने गच्छिंती अटळ आहे. ही बाब लक्षात घेता भारताने सावध पावले उचलली पाहिजेत. अजूनही पाकिस्तानी दहशदवादी भारतात घुसल्याचे उघड झाले आहे. कधी काय होईल सांगता येत नाही. मुंबई हल्ला, भारतीय संसदेवर हल्ला अशी अनेक उदा. आहेत. त्यामुळे सतर्कता बरोबर भारताने पाकिस्तान ताब्यात घ्यावा किंवा त्याला वटणीवर आणून गळ्यात दावे बांधणे हीतावह आहे. मुळात पाकिस्तानात कोणाचेही सत्ता आली तरी तो मित्र होवू शकणार नाही हे सतत लक्षात ठेवण्याची गरज आहे.

# शिक्षण : व्यक्तिमत्त्व, समाज आणि राष्ट्र घडविण्याची परिवर्तनशील प्रक्रिया

शिक्षण हा मानवी जीवनाचा मूलाधार आहे. मनुष्य जन्मतः केवळ 'जैविक अस्तित्व' घेऊन येतो, परंतु शिक्षणामुळे तो 'मानव' होतो. विचार करणे, निर्णय घेणे, योग्य-अयोग्य यातील फरक ओळखणे, मूल्ये अंगीकारणे, समाजात सुसंवाद राखणे, प्रगतीकडे वाटचाल करणे या सर्व गोष्टी शिक्षणातून घडतात. म्हणूनच शिक्षणाला जीवनाचा 'प्राणवायू' म्हणणे सयुक्तिक ठरेल. ११ नोव्हेंबर हा 'राष्ट्रीय शिक्षण दिन' भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण देशभर साजरा केला जातो. मौलाना आझाद यांनी शिक्षणाला केवळ रोजगाराचे साधन मानले नाही, तर त्यांनी शिक्षणाला राष्ट्रनिर्मितीचे साधन, सामाजिक परिवर्तनाचे माध्यम आणि मानवतेचे संवर्धन करणारा आधारस्तंभ मानले. त्यांचा स्पष्ट विश्वास होता की शिक्षण हे सर्वांसाठी समानरित्या उपलब्ध झाले तरच समाजात खरी समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित होईल. म्हणूनच आजच्या काळात शिक्षणाच्या अर्थाचे, उपयोगाचे आणि गरजेचे नव्याने पुनर्मूल्यांकन करणे ही काळाची गरज आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिल्यास समाज हा माणसांच्या परस्पर संबंधांचे, विचारांचे, संस्कृतीचे, अधिकारांचे आणि संस्थांचे गुंफण आहे. या संपूर्ण सामाजिक संरचनेचे मुख्य नियंत्रण शिक्षण करत असते. शिक्षण समाजात नवे विचार आणते, जुन्या परंपरांचे चिकित्सक पुनर्विलोकन करते, बदल स्वीकारण्याची प्रेरणा देते आणि समाजाला प्रगत दिशेने पुढे नेत राहते. शिक्षण हे फक्त ज्ञान देणे नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याची सर्जनशील प्रक्रिया आहे. समाज जसा बदलत जातो तसाच शिक्षणाचा आविष्कारही बदलत जातो. कालपरत्वे शिकविण्याच्या पद्धती, विषय, उद्दिष्टे, साधने, शिक्षक-विद्यार्थी नाते यांच्या स्वरूपात बदल होत गेले आहेत; परंतु शिक्षणाचा मुख्य हेतू आजही तोच आहे. माणसाला जगण्याची कला शिकविणे आणि समाज अधिक मानवी, न्याय्य व प्रगतिशील करणे.

भारतीय समाजाची ऐतिहासिक रचना पाहता शिक्षण नेहमीच सामाजिक स्तरांच्या आधारे नियंत्रित राहिले. प्राचीन काळातील गुरुकुल पद्धतीत ज्ञानाची देवाणघेवाण होत असली तरी सर्वांना समान संधी उपलब्ध नव्हती. काही विशिष्ट वर्णांना ज्ञान मिळण्याचा अधिकार होता, तर इतरांना ज्ञानापासून दूर ठेवण्यात आले. ज्ञानाचे हे केंद्रीकरण समाजातील असमानता वाढविणारे ठरले. मध्ययुगीन काळातही धार्मिक संस्था, राजकीय सत्ता आणि सामाजिक रूढी यांच्या आधारे ज्ञानाची मर्यादा घातली गेली. ब्रिटिश काळात इंग्रजी शिक्षणाची सुरुवात झाली, तर्कशास्त्रीय आणि वैज्ञानिक विचारांची जागृती झाली, पण त्याचा उद्देश भारतीय समाजाला ज्ञानसमृद्ध करणे नसून प्रशासनासाठी प्रशिक्षित कर्मचारी मिळवणे हा होता. स्वतंत्र भारताने मात्र शिक्षणाला समाजाच्या केंद्रस्थानी ठेवले. भारतीय संविधानाने शिक्षणाला मूलभूत अधिकाराचा दर्जा दिला. 'समानता' आणि 'समावेशकता' हे शिक्षणाचे मार्गदर्शक तत्व म्हणून ठरविले. परंतु आजही शहर व ग्रामीण भाग, आर्थिक स्तर, लिंग, जाती, प्रदेश, आदिवासी आणि दुर्बल गटांमध्ये शिक्षणाच्या संधींत प्रचंड अंतर आहे.

आज शिक्षणाच्या क्षेत्रात दिसणारी सर्वात मोठी असमानता म्हणजे 'गुणवत्तेतील तफावत'. मोठ्या शहरांतील कॉर्पोरेट शाळा आधुनिक साधनांनी सुसज्ज आहेत, तर अनेक ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता, प्रयोगशाळा-अभाव, डिजिटल सुविधांची मर्यादा, मुलींसाठी सुरक्षा आणि वाहतूक यांसारखी मूलभूत समस्या कायम आहेत. ज्या मुलांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळते ते समाजात पुढे जातात; तर जे शिक्षणापासून वंचित राहतात ते मागे पडतात. अशा वेळी शिक्षण सामाजिक गतिशीलता थांबविण्याचे साधन ठरते, आणि समाजात नवीन असमानता अधिक स्पष्ट होत जाते. म्हणूनच शिक्षणाचा प्रसार करताना केवळ शाळांची संख्या वाढवणे पुरेसे नाही, तर शिक्षणाची गुणवत्ता, पोहोच, सुरक्षितता, समतोल निधी, प्रशिक्षित शिक्षक आणि प्रगत अभ्यासक्रम हे मुद्दे अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

शिक्षणाचा खरा उद्देश समाजात विवेकपूर्ण नागरिक घडविणे हा आहे. केवळ पदव्या मिळविणे म्हणजे शिक्षित होणे नाही. शिकलेला मनुष्य तर्क करतो, विश्लेषण करतो, समस्या समजून त्यावर उपाय शोधतो, भेदभावाला प्रश्न विचारतो, अंधश्रद्धेला आव्हान देतो आणि न्याय्य समाजाच्या निर्मितीत सक्रिय सहभाग घेतो. लोकशाही राष्ट्रासाठी 'सजग' नागरिकांची निर्मिती ही शिक्षणाची सर्वात मोठी देणगी आहे. केवळ मतदान करणे किंवा कायदे माहित असणे म्हणजे नागरिकत्व नाही; तर समाजाच्या भल्यासाठी विचारपूर्वक कृती करणे, सामाजिक समरसता राखणे आणि राष्ट्रीय एकात्मतेला बळ देणे हा खरा नागरिकत्वाचा अर्थ आहे. शिक्षण व्यक्तीला ही समग्र जबाबदारीची जाणीव करून देते.

शिक्षणाशिवाय आर्थिक विकास शक्य नाही. आजचे युग ज्ञानाधारीत अर्थव्यवस्थेचे आहे. देशात उद्योग, तंत्रज्ञान, कृषी, आरोग्य, विज्ञान, संशोधन, व्यवस्थापन या सर्व क्षेत्रांत कुशल मनुष्यबळाची गरज आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण हे रोजगारक्षमतेचे आणि रोजगारनिर्मितीचे मूळ आहे. देशाचा विकासदर, उत्पादनक्षमता आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकता ही थेट शिक्षणाच्या पातळीवर अवलंबून असते. नवीन शिक्षण धोरण २०२० मध्ये कौशल्याधारित शिक्षण, बहुविद्याशाखीय शिक्षण, डिजिटल साक्षरता, संशोधन आणि नवोन्मेष यांना मिळालेला भर महत्त्वाचा आहे. मात्र, धोरणे तेव्हाच परिणामकारक ठरतात जेव्हा त्यांची अंमलबजावणी प्रामाणिकपणे, योजनेनुसार आणि सर्वसमावेशक दृष्टीकोनातून केली जाते.

शिक्षणात शिक्षकाची भूमिका केंद्रस्थानी आहे. शिक्षक म्हणजे ज्ञान देणारा, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे तो मूल्यांची संस्कृती रुजविणारा. शिक्षक विद्यार्थ्यांच्या अंतर्मनातील प्रतिभा ओळखून तिला योग्य दिशा देतो. शिक्षण यशस्वी होण्यासाठी शिक्षक-विद्यार्थी संबंध विश्वास, आदर आणि सर्जनशील संवाद यांवर आधारित असणे आवश्यक आहे. आज तंत्रज्ञान शिक्षणात महत्त्वाची भूमिका निभावत आहे. ऑनलाइन शिक्षण, डिजिटल साधने, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित पद्धती आल्या आहेत, परंतु मानवी भावनिक स्पर्श, प्रेरणा, सहानुभूती आणि संस्कार ही कामे शिक्षकच करू शकतो. 'शिक्षक हा केवळ शाळेत शिकवणारा नसून, तो समाजाचा घडवणारा शिल्पकार आहे' हे विसरून चालणार नाही.

स्त्री शिक्षण हा समाज परिवर्तनाचा महत्त्वाचा भाग आहे. स्त्री शिक्षित झाली तर कुटुंब शिक्षित होते, पुढची पिढी जागरूक होते, समाज प्रगत होतो. मुलींना माध्यमिक आणि उच्च शिक्षण मिळण्यात आजही ग्रामीण भागात अडथळे आहेत. सामाजिक अडथळे, लिंगभेद, पायाभूत सुविधांचा अभाव, लवकर लग्नाची प्रथा, सुरक्षिततेची चिंता हे प्रश्न दूर केल्याशिवाय 'समता' ही कल्पना केवळ घोषणेतच राहील. त्यामुळे मुलींना शिक्षण देण्याचे कार्य हे केवळ शासकीय धोरण नसून संपूर्ण समाजाने स्वीकारलेली मूल्यबद्ध जबाबदारी असणे आवश्यक आहे.

शिक्षणाचा आणखी एक महत्त्वपूर्ण पैलू म्हणजे मूल्यशिक्षण होय. आज जग झपाट्याने बदलत आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाने सुविधा वाढल्या आहेत, पण माणसामधील भावनिक अंतरही वाढले आहे. स्वार्थ, स्पर्धा, सामाजिक तणाव, धार्मिक वैमनस्य, हिंसा आणि असहिष्णुता समाजात चिंतेचे विषय बनत आहेत. अशा वेळी शिक्षणाने फक्त ज्ञान न देता 'मानवी मूल्ये' पेरणे अत्यावश्यक आहे. सहजीवन, परस्पर आदर, करुणा, जबाबदारी, सहिष्णुता, संवेदनशीलता ही मूल्ये शिकवणारे शिक्षण राष्ट्राला स्थिर, मजबूत आणि सुदृढ बनवते.

राष्ट्रीय शिक्षण दिन हा केवळ एका नेत्याची जयंती नाही. तो शिक्षणाच्या मूल्यांचा पुनःस्मरणाचा, समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत शिक्षण पोहोचविण्याच्या संकल्पाचा दिवस आहे. हा दिवस आपल्याला सांगतो की शिक्षणात असमानता राहिली, तर समाजातही समता निर्माण होऊ शकत नाही. शिक्षण सर्वांना समानरित्या उपलब्ध झाले, गुणवत्तापूर्ण झाले, मूल्याधारित झाले आणि सर्वसमावेशक झाले तर समाज आपोआप न्याय्य, सुसंस्कृत आणि प्रगतिशील बनेल. म्हणून आजच्या राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या निमित्ताने आपण हे स्पष्टपणे ठरवूया की शिक्षण हे केवळ करिअर घडविण्याचे साधन नाही, ते 'जीवन घडविण्याची कला' आहे. शिक्षण हे केवळ स्पर्धेसाठी नाही, ते 'समानतेसाठी' आहे. शिक्षण हे केवळ व्यक्तीला उंचावण्यासाठी नाही, ते 'समाज आणि राष्ट्र उंचावण्यासाठी' आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे की, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जी कुणी प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. तसेच मौलाना अबुल कलाम आझाद यांनी म्हटले होते की शाळा बंद पडली तर राष्ट्र बांधणे थांबते. म्हणून शिक्षणाचा दिवा फक्त प्रज्वलित करायचा नाही, तर सतत तेजस्वी ठेवायचा आहे. कारण शिक्षण हे भविष्य घडवते, आणि घडवलेले भविष्यच राष्ट्राचे स्वप्न पूर्ण करते.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. ९९६०१०३५८२,**

# जिल्हा परिषद निवडणुकीसाठी नियुक्त नोडल अधिकारी यांनी आपली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी- जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे




**लातूर/प्रतिनिधी :** राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी जिल्हास्तरावर नियुक्त सर्व नोडल अधिकाऱ्यांनी आपली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या काळजीपूर्वक पार पाडाव्यात. यामध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हास्तरीय नोडल अधिकारी यांच्या बैठकीत त्या बोलत होत्या.

निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश पवार, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पुरुषोत्तम रुक्मे, जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी राजेंद्र नागणे यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने आणि शांततेत पार पाडण्यासाठी सर्व नोडल अधिकारी यांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी. ग्रामीण भागातील मतदान केंद्रांची सद्यस्थितीचा आढावा घ्यावा, त्याठिकाणी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी अधिकारी, कर्मचारी यांना योग्य प्रशिक्षण द्यावे. मतदार जागृतीसाठी विविध उपक्रम हाती घ्यावेत. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करावी. विशेषतः सोशल मिडीयावर लक्ष ठेवण्यासाठी पोलीस विभागाने विशेष कक्ष कार्यान्वित करावा, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. तसेच कायदा व सुव्यवस्था, मनुष्यबळ व्यवस्थापन आदी विविध अनुषंगाने यावेळी आढावा घेण्यात आला.

उपजिल्हाधिकारी श्री. पवार यांनी जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेले विविध कक्ष आणि त्याच्या नोडल अधिकारी यांनी पार पाडवयाची जबाबदारी याविषयी माहिती दिली.

## Bad Cholesterol ला मुळापासून दूर करण्यासाठी सकाळीच प्या 'हा' चहा, रात्रीपर्यंत दिसेल फरक

आजच्या काळात लहान वयातच लोक गंभीर आजारांनी ग्रस्त आहेत. या आजारांमध्ये उच्च कोलेस्ट्रॉलची समस्या सर्वात जास्त आहे. शरीरातील कोलेस्ट्रॉल वाढल्याने हृदयविकाराचा झटका, पक्षाघात यांसारख्या आजारांसह अनेक गंभीर आजार होऊ शकतात. आम्ही तुम्हाला सांगतो की, कोलेस्ट्रॉल हा आपल्या रक्तात जमा झालेला एक चिकट पदार्थ आहे. शरीरात त्याच्या जास्तीमुळे शिरा ब्लॉक होऊ लागतात. अशा परिस्थितीत, त्याची पातळी कमी करणे खूप महत्वाचे आहे. जर तुम्हाला खराब कोलेस्ट्रॉलला नियंत्रण ठेवायचे असेल तर तुम्ही अनेक प्रकारच्या खाद्यपदार्थांचे सेवन करू शकता. या आरोग्यदायी पदार्थांच्या यादीत तुम्ही चहाचाही समावेश करू शकता. महत्त्वाचे म्हणज तुमचे कोलेस्ट्रॉल काही तासांत नियंत्रित होऊ शकते. हा खास चहा बनवण्यासाठी तुमच्या स्वयंपाकघरात ठेवलेली दालचिनी, लिंबू आणि लसूण आवश्यक आहे. चला जाणून घेऊया त्याची रेसिपी आणि फायदे काय आहेत

**आवश्यक साहित्य:-**
दालचिनी पावडर - १ टीस्पून
लसूण - २ ते ३ पाकळ्या
लिंबाचा रस - १ टेबलस्पून
पाणी - १ कप
बनवण्याची पद्धत

ही स्पेशल रेसिपी तयार करण्यासाठी, प्रथम एक पॅन घ्या, त्यात १ कप पाणी घाला आणि चांगले उकळवा. यानंतर त्यात किसलेला लसूण घालून उकळवा. आता ते गाळून त्यात दालचिनी पावडर आणि लिंबाचा रस टाकून रिकाम्या पोटी गरम गरम प्या. यामुळे खूप फायदा होईल.

**हा चहा दिवसा कसा घ्यावा:-**

कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी, खाण्यापूर्वी किंवा रिकाम्या पोटी या विशेष चहाचे सेवन करा. यातून तुम्हाला खूप फायदा होऊ शकतो. मात्र, हा चहा तुम्ही कधीही घेऊ शकता. यामुळे तुम्हाला इतर अनेक समस्यांपासूनही सुटका मिळू शकते.

**चहाच्या विविध घटकांचे फायदे:-**

लसूण कोलेस्ट्रॉल कमी करते: शरीरातील वाढणारे कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी लसणाचा चहा घेणे खूप आरोग्यदायी ठरू शकते. त्यात असलेले गुणधर्म कोलेस्टेरॉलचे ऑक्सिडेशन रोखू शकतात, ज्यामुळे तुमचे वाढते कोलेस्ट्रॉल कमी होऊ शकते. हे वजन कमी करण्यास देखील मदत करू शकते.

दालचिनी खराब कोलेस्ट्रॉल कमी करते: शरीरातील खराब कोलेस्ट्रॉलची वाढती पातळी कमी करण्यासाठी दालचिनीचे सेवन करा. त्यात असलेले गुणधर्म ऑक्सिडेटिव्ह तणाव कमी करू शकतात, जे खराब कोलेस्टेरॉल (७७) ची पातळी कमी करण्यात मोठ्या प्रमाणात मदत करू शकतात. तसेच शरीरातील सूज कमी करू शकते.

लिंबूने कोलेस्ट्रॉल कमी करा: लिंबाचा रस केवळ तुमची कमकुवत प्रतिकारशक्ती वाढवू शकत नाही, परंतु त्याच्या मदतीने तुम्ही खराब कोलेस्ट्रॉल देखील कमी करू शकता. यामध्ये अनेक प्रकारचे अँटिऑक्सिडेंट असतात, जे खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यात प्रभावी असतात.

शरीरातील खराब कोलेस्ट्रॉलची वाढती पातळी कमी करण्यासाठी तुम्ही या खास पद्धतीने बनवलेल्या चहाचे सेवन करू शकता. लक्षात ठेवा की जर तुमची प्रकृती बिघडत असेल तर तुमच्या आरोग्य तज्ञाची मदत घ्या.

## ताप, सांधेदुखी असेल तर वेळीच सावध व्हा; 'हा' आजार असेल तर ३ महिन्यानंतर मृत्यू, लॅन्सेटचं संशोधन

अनेकदा पावसाळा असो किंवा हिवाळा या ऋतुमध्ये सर्दी, खोकलाा यांसारखे आजार सामान्य वाटता. हवामानानुसार सर्दी आणि फ्लूसारखे काही आजार सहज बरे होतात. पण डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया यांसारख्या काही आजारांवर वेळीच उपचार केले नाही तर मृत्यू होण्याची शक्यता जास्त असते. दरम्यान आफ्रिकन देशातील टांझानियामध्ये चिकुनगुनिया हा सर्वात सामान्य आजार आहे. त्यानंतर रोगाने संपूर्ण जगाला विळखा घातला आहे. त्यातच आता चिकुनगुनियाची लागण झालेल्या लोकांना संसर्ग झाल्यानंतर १० ते १५ दिवस नव्हे तर तीन महिन्यांपर्यंत मृत्यूचा धोका असतो, असे नव्या संशोधनातून समोर आले आहे. त्यामुळे चिकुनगुनिया झालेल्या रुग्णांनी विशेष काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

कोरोना विषाणूप्रमाणेच चिकुनगुनिया हा आजार असून तो विषाणूंपासून याचा संसर्ग होतो. गेल्या काही वर्षांपासून चिकनगुनिया हा सार्स, बर्ड फ्लू, डेंग्यू इत्यादी आजारांच्या पंक्तीतच येऊन बसला आहे. चिकुनगुनिया हा एडिस प्रजातीच्या डासांद्वारे पसरणाऱ्या विशिष्ट विषाणूमुळे होणारा आजार आहे. सलग दोन-तीन दिवस ताप, डोके दुखणे, विशेषत: पाठ, पोट, कंबर या भागांवर पुरळ आणि हातापायांचे सांधे दुखू लागतात.

**चिकनगुनियाची लक्षणे**

हा आजार सांध्यातील वेदना, अचानक ताप येणे आणि थरथरणेपासून सुरुवात होते. या व्यतिरिक्त रुग्ण स्नायू दुखणे, थकवा आणि मळमळ, डोकेदुखी, पुरळ आणि सांधेदुखीची तक्रार करतो. या वेदना चिकनगुनिया ताप बरा झाल्यानंतरही कायम राहतात.

**नेमकं काय म्हणतात लॅन्सेटचं संशोधन**

या संशोधनात 'द लॅन्सेट संसर्गजन्य रोग'या अहवालात प्रसिद्ध झालेल्या, चिकुनगुनिया हा एक विषाणूजन्य आजार आहे, जो डासांनी चावल्यामुळे माणसांमध्ये पसरतो. याला शक्यतो पिवळा ताप ही म्हणतात. तसेच बहुतेक रुग्ण पूर्णपणे बरे होतात, परंतु चिकुनगुनिया हा आजार अजूनही प्राणघातक ठरू शकतो. संसर्गाची बहुतेक प्रकरणे नोंदवली जात नाहीत, परंतु २०२३ म ध्ये, जगभरात सुमारे पाच लाख लोकांना चिकुनगुनियाची लागण तर ४०० हून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला. तीव्र संसर्गाच्या कालावधीनंतर लोकांना गुंतागुंत होण्याचा धोका असतो. तीव्र संसर्गाचा कालावधी लक्षणे दिसल्यानंतर १४ दिवसांचा असतो. तसेच पहिल्या आठवड्यात संक्रमित व्यक्तीचा मृत्यू होण्याचा धोका दुसऱ्या व्यक्तीपेक्षा आठ पटीने जास्त असतो. तसेच संसर्ग झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत संक्रमित व्यक्तीकडून गुंतागुंत होण्याचा धोका दुप्पट होतो.

**चिकनगुनियाची कारणे**

चिकुनगुनियाचा विषाणू संक्रमित डासांच्या चाव्यामुळे पसरतो. चिकुनगुनिया विषाणूने पीडित व्यक्तीला आपोआप संसर्ग होतो. चिकनगुनिया विषाणूला 'सायलेंट' संसर्ग म्हणून ओळखले जाते.

**चिकुनगुनियावर उपचार काय**

चिकुनगुनियावर कोणताही विशिष्ट उपचार उपलब्ध नाही आणि काही औषधांनी लक्षणे कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. या प्रकरणात, नॉन-स्टेरॉइडल अँटी-इंफ्लेमेटरी औषधे वेदना कमी करण्यास मदत करतात. अँटीव्हायरल औषधे जसे की एसायक्लोव्हिर (डॉक्टरांच्या सल्ला घ्या) दिली जातात. तसेच, अधिक द्रव पिणे हायड्रेटेड ठेवण्यास मदत करते.

# हे करा आहारात बदल : वय कितीही वाढले तरी त्वचा तशीच

मुंबई : त्वचेचं सौंदर्य फक्त बाहेरून लावल्या जाणाऱ्या क्रीम्स, फेस मास्क किंवा लोशन्सवर अवलंबून नसतं. यामागे खरा आधार असतो आपल्या आहाराचा. आपण रोज काय खातो आणि आपल्या शरी-रात कोणते पोषक घटक पोहोचतात, यावर त्वचेचं आरोग्य मोठ्या प्रमाणात अवलंबून असतं.

जर तुम्हाला नैसर्गिकरित्या त्वचा सुंदर, कोमल आणि तरुण ठेवायची असेल, तर फक्त बाह्य उपचार नव्हे, तर योग्य आहार घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. शरीरात योग्य पोषण मिळालं तर त्वचा आतून आरोग्यपूर्ण राहते आणि चेहऱ्यावर तेज दिसून येतो. यासाठी काही विशिष्ट खाद्यपदार्थ तुमच्या रोजच्या आहारात असायलाच हवेत.

चला तर पाहूया, असे कोणते ८ सुपरफूड्स आहेत जे तुमच्या त्वचेला दीर्घकाळ तरुण आणि तजेलदार ठेवू शकतात:



१) डार्क चॉकलेट

कोकोने भरलेले डार्क चॉकलेट केवळ चवीलाच भारी नाही तर त्वचेसाठीही फायद्याचं ठरतं. यामध्ये कोको फ्लेव्हॅनॉल्स असतात, जे एक प्रकारचे अँटिऑक्सिडंट आहेत. हे त्वचेला णत किरणांपासून संरक्षण देतात, रक्ताभिसरण वाढवतात आणि



त्वचा मऊ ठेवतात. ७०% किंवा त्याहून अधिक कोको असलेले डार्क चॉकलेट निवडा.

२) टोमॅटो

टोमॅटोमध्ये भरपूर प्रमाणात लाइकोपीन नावाचा अँटिऑक्सिडंट असतो, जो त्वचेला सूर्यकिरणांपासून संरक्षण देतो आणि त्वचेला चमक देतो. विशेष म्हणजे, टोमॅटो शिजवल्यावर त्यातील लाइकोपीन अधिक प्रभावी होतो. त्यामुळे टोमॅटो रस किंवा भाजी रूपात नियमित खाणं फायदेशीर.

३) डाळिंब

डाळिंबामध्ये अँथोसायनिन्स, इलॅजिक ॲसिड आणि अँटीऑक्सिडंट्स असतात जे त्वचेवर होणारे वृद्धत्वाचे परिणाम कमी करतात. डाळिंब सॅलड, ज्यूस किंवा फळ म्हणून घेतल्यास त्वचेला नैसर्गिक उजळपणा मिळतो.

४) सिमला मिर्ची

समला मिर्ची ही व्हिटॅमिन उ चा उत्तम स्रोत आहे. हे व्हिटॅमिन कोलेजन तयार करण्यासाठी आवश्यक असतं, जे त्व-चेला घट्ट आणि लवचिक बनवते. शिवाय, यामध्ये कॅरोटीनॉइड्स नावाचे अँटिऑक्सिडंट्स असतात, जे त्वचेला वय वाढल्यावर येणाऱ्या सुरकुत्यांपासून वा-चवतात.

५) रताळे

रताळ्यामध्ये बीटा-कॅरोटीन भरपूर प्रमाणात असतो, जो शरीरात जाऊन व्हिटॅमिन - मध्ये रूपांतरित होतो. हे त्वचेला कोरडे होण्यापासून वाचवतो, लवचिकता राखतो आणि त्वचेच्या पेशींना संरक्षण देतो. त्याचबरोबर, रताळं व्हिटॅमिन उ आणि ए चा देखील चांगला स्रोत आहे.

६) पालक

ही हिरवीपानांची भाजी केवळ लोहतत्त्वासाठीच नाही, तर त्वचेच्या आरोग्यासाठीही अत्यंत उपयुक्त आहे. अँटिऑक्सिडंट्स आणि भरपूर पाण्याचं प्रमाण असल्यामुळे, पालक त्वचेला हायड्रेट ठेवतो. यासोबतच, यामध्ये त्वचेच्या संरक्षणासाठी आवश्यक असे विविध पोषक घटकही असतात.

७) एवोकॅडो

एवोकॅडोमध्ये चांगल्या प्रकारचे फॅट्स म्हणजेच मोनो आणि पॉलीअनसॅच्युरेटेड फॅट्स असतात, जे त्वचेला कोरडे होण्यापासून वाचवतात आणि आर्द्रता टिकवून ठेवतात. तसेच, यामध्ये जीवनसत्त्वे -, उ, ए आणि घ भरपूर प्रमाणात असतात, जे त्वचेला दीर्घकाळ उजळ आणि निरोगी ठेवतात.

८) ब्रोकोली

ब्रोकोली हे एक शक्तिशाली अँटी-एजिंग अन्न आहे. यामध्ये अँटीऑक्सिडंट्ससह व्हिटॅमिन उ आणि घ असते, जे त्वचेच्या सुरकुत्या कमी करण्यात मदत करतात. ब्रोकोली कच्चं किंवा वाफवून खाल्ल्यास त्याचे पोषणमूल्य अधिक चांगल्या प्रकारे मिळते.

त्वचेला दीर्घकाळ तारुण्य आणि तेज राखून द्यायचं असेल, तर वर सांगितलेले पदार्थ तुमच्या आहारात नक्की असावेत. हे केवळ त्वचेसाठी नव्हे तर एकूणच शरीरासाठी फायदेशीर आहेत. योग्य आहार, भरपूर पाणी, नियमित झोप आणि तणावमुक्त जीवनशैली हे त्वचेच्या सौंदर्याचं खरं रहस्य आहे.

## मधुमेहींसाठी आरोग्यदायी

सवयींमध्ये संतुलित आहार घेणे, नियमित व्यायाम करणे आणि तणाव व्यवस्थापित करणे महत्त्वाचे आहे. आहारात फायबरयुक्त पदार्थांचा समावेश करा, कमी ग्लायसेमिक इंडेक्स असलेले पदार्थ निवडा आणि साखरेचे प्रमाण जास्त असलेले पदार्थ टाळा. तसेच, पुरेशी झोप घेणे आणि रक्तातील साखर नियमित तपासणे आवश्यक आहे.

**आहाराबाबत-**फायबरयुक्त पदार्थ: आहारात संपूर्ण धान्ये, भाज्या, फळे आणि डाळी यांचा समावेश करा, कारण त्यातून फायबर मिळते.

**कमी ग्लायसेमिक इंडेक्स:** रक्तातील साखर स्थिर ठेवण्यासाठी कमी ग्लायसेमिक इंडेक्स असले-ले पदार्थ निवडा, जसे की शेंगदाणे आणि कमी चरबीयुक्त चीज असलेले संपूर्ण धान्य क्रॅकर्स.

**साखरयुक्त पदार्थ टाळा:** सोडा, गोड चहा, ज्यूस, प्रक्रिया केलेले अन्न, पांढरा भात, केक, कुकीज आणि चिप्स यांसारखे साखरेचे प्रमाण जास्त अस-लेले पदार्थ खाणे टाळा.

**भाग नियंत्रण:** एका वेळी जास्त खाणे टाळा आणि 'भाग नियंत्रण' पाळा.

**व्यायामाबाबत-नियमित व्यायाम:** रोज किमान ३० मिनिटे चालणे, योगा किंवा हलका व्यायाम करा. नियमित व्यायामामुळे ग्लुकोज वापरणे सोपे होते.

व्यायामापूर्वी आणि नंतर तपासणी: व्यायाम करण्यापूर्वी आणि नंतर रक्तातील साखरेची पातळी तपासा.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका

महाराष्ट्र राज्यात ज्याची राजकीय घटकांना कमालीची प्रतीक्षा होती, त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे 'बिगुल' वाजले आहे. निवडणूक आयोगाकडून राज्यातील २४६ नगर परिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुका जाहीर केल्याने राज्यभरात आता आचारसंहिता सुरू झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकर व्हाव्यात, यासाठी स्थानिक पातळीवर अनेक राजकीय घटकांनी आपल्या घरातील देवही कदाचित पाण्यात ठेवले असावेत. २०२० साली देशात कोरोनाचे आगमन झाल्यानंतर राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. कधी न्यायालयीन प्रक्रियेमुळे तर कधी ओबीसी आरक्षणामुळे स्थानिक निवडणुकांना सातत्याने विलंब होत गेला. सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६ पर्यंत महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊन त्यांचे निकालही सादर करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला दिले. मतदारयाद्यांचा मुद्दा अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे निवडणुका लांबणीवर पडण्याची टांगती तलवार राजकीय घटकांवर व त्यांच्या पक्षांवर होती. आता निवडणूक आयोगाकडून नगर परिषदा व नगर पंचायतींचा निवडणूक कार्यक्रमच जाहीर केल्याने राजकीय कुरुक्षेत्रावर हालचालींना गती प्राप्त झाली आहे. या निवडणुका होताच महानगरपालिकांच्याही निवडणुकांचाही कार्यक्रम जाहीर होणार असल्याचे बोलले जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या राजकारणात महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.



विधानसभा निवडणुकांच्या माध्यमातून राज्य व लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून देशावर सत्ता मिळविण्यासाठी स्थानिक पातळीवरील नगर परिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, महानगरपालिका ताब्यात असणे आवश्यक असते. लोकशाहीतील सत्तेचा पाया म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांकडे नेहमीच पाहिले जाते. महाविकास आघाडी व महायुती महाराष्ट्राच्या राजकारणात कार्यरत असली तरी स्थानिक निवडणुकांना ते एकत्रितपणे सामोरे जाण्याची शक्यता कमीच आहे. त्या त्या भागा-तील स्थानिक राजकीय समीकरणे, पक्षाची ताकद, नेतेमंडळींचा प्रभाव, पदाधिकाऱ्यांचा जनसंपर्क यावरही बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात. पक्ष संघटना चालविण्यासाठी, नावारूपाला आणण्यासाठी, पक्षाकडे जनाधार वळविण्यासाठी स्थानिक भागा-तील कार्यकर्ते व पदाधिकारी खऱ्या अर्थाने परिश्रम करत असतात. आमदार, खासदारांचा तळागाळातील जनतेशी प्रत्यक्ष संबंध येत नाही. त्यांनाही स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांवर व पदाधिकाऱ्यांवर अवलंबून राहावे लागते. आता निवडणुकांच्या तारखाच जाहीर झाल्याने वेळेचे गणित सांभाळत प्रत्येक पक्षाला व त्यांच्या नेतेमंडळींना तसेच पदाधिकाऱ्यांना राजकीय सारीपाटावर 'मिले सूर मेरा तुम्हारा' हे गाणे युती, महायुती, आघाडीमध्ये आळवावे लागणार आहे. स्थानिक निवडणुकांमध्ये पक्षाची राजकीय ताकद स्पष्ट होत असल्याने या निवडणुकांमध्ये सर्वांचीच प्रतिष्ठा पणाला लागलेली असते. काही राजकीय पक्षांचा, नेतेमंडळींचा शहरी भागात, तर काहींचा ग्रामीण भागामध्ये प्रभाव अधिक असतो. काहींची पक्षबांधणी, नेतेमंडळींचा प्रभावही त्या त्या भागानुसार बदली होत असतो. जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपंचायती व नगर परिषदांमध्ये प्रभावी ठरणाऱ्या पक्ष संघटनांना शहरी भागातील महापालिका निवडणुकांमध्ये फारसा प्रभाव पाडता येत नाही, त्यांना मर्यादा पडतात. नाण्याची दुसरी बाजू पडताळल्यास महापालिका निवडणुकांवर सत्ता मिळणाऱ्या पक्षांना ग्रामीण भागातील जनता फारशी स्वीकारत नसल्याचे अनेक निवडणुकांमध्ये पाहावयास मिळाले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मागील निवडणुका व आताच्या निवडणुकांमध्ये कमालीचा फरक पाहावयास मिळणार आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीची व ठाकरेंच्या शिवसेनेची विभागणी झाली आहे. अजित पवारांच्या माध्यमातून राष्ट्रवादीत, तर एकनाथ शिंदेंच्या माध्यमातून शिवसेनेत फूट पडली आहे. शरद पवार आणि उबाठा हे काँग्रेससोबत महाविकास आघाडीमध्ये विरोधकांच्या भूमिकेत, तर अजित पवार व एकनाथ शिंदे हे भाजपसोबत महायुतीमध्ये सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेत आहेत. एकेकाळचे हाडवैर विसरून ठाकरे बंधू काही महिन्यांपासून राजकीय सारीपाटावर गळ्यात गळे घा-लून एकमेकांचे गोडवे गावू लागल्याने काही प्रमाणात राजकीय समीकरणात उलथापालथ होण्याची शक्यता आहे. अर्थात शिवसेना उबाठा गट व मनसे एकत्र आली आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीने जरी त्यास संमती दिली तरी मनसेशी जवळीक करायला काँग्रेस राजी होण्याची शक्यता कमीच आहे. परप्रांतीय मते भाजपने आपल्याकडे वळविली असली तरी काही टक्का आजही काँग्रेसकडे आहे. तो टक्का गमवावा लागू नये यासाठी काँग्रेस मनसेशी मिलाफ करून स्वत:च्या पायावर दगड मारून घेणार नाही. स्थानिक निवडणुकांमध्ये खऱ्या अर्थाने पक्षाची, कार्यकर्त्यांची व पदाधिकाऱ्यांची राजकीय ताकद समजत असल्याने जागावाटपामध्ये राजकीय वादावादी होतात.

पक्षासाठी राबणाऱ्या, पक्षाचा जनाधार वाढविण्यासाठी घरादाराकडे दुर्लक्ष करून सतत जनसामान्यांमध्ये कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये, पक्षाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये स्थानिक निवडणुका लढविण्याची महत्त्वाकांक्षा पाहता युती, महायुती, आघाडीच्या नावाखाली संबंधित घटक तलवारी म्यानात घालण्यास सहजासहजी तयार होत नाहीत. पक्षासाठी राबून पक्ष आपल्या कार्याचा, परिश्रमाचा विचार करणार नसेल तर पक्षाला नमस्कार करून नवीन पक्षामध्ये जाण्यासही अनेकजण मागे-पुढे पाहत नाहीत. आपल्यासाठी कष्ट करणाऱ्या कार्यकर्त्यांना, पदाधिकाऱ्यांना गमविणे पुढील वाटचालीत हानिकारक ठरणार असल्याने वरिष्ठांनाही या सर्व कंगोऱ्यांचा गांभीर्याने राजकीय अभ्यास करावा लागतो. स्थानिक भागातील कार्यकर्ते व पदाधिकारी हे पक्ष संघटनेसाठी व नेतेमंडळींसाठी अवघड जागेचे दुखणे असल्याने अनेकदा राज्यात व केंद्रात युती, महायुती, महाआघाडी असली तरी स्थानिक भागातील निर्णय अनेकदा स्थानिकांवर सोपविण्याची अगतिकता राज्य व केंद्र पातळीवरील नेतेमंडळींना स्वीकारावी लागत असते. नगर परिषदा व पंचायत समित्यांपाठोपाठ महापालिका निवडणुकांचेही बिगुल लवकरच वाजेल. मुंबई महापालिकेसाठी महाविकास आघाडी व महायुतीने गेल्या काही महिन्यांपासून मोर्चेबांधणी केलेली आहे. स्थानिक निवडणुका प्रत्येकासाठीच प्रतिष्ठेच्या असल्याने पक्षातील वरिष्ठ नेतेमंडळींनाही या निवडणुकांमध्ये व्यस्त राहण्याची

## डॉक्टर टीप्स

### पुरुषांनी चुकून खाऊ नये हे ५ पदार्थ, शारीरिक कमतरता जाणवू शकते

बदलत असलेली जीवनशैलीचा प्रभाव दांपत्य जीवनावर पडत आहे. हल्ली ताणावाच प्रभाव मॅरिड लाईफवर पडत असून अनेक दंपती बाळाला जन्म घालण्यास समर्थ ठरतं आहे. खानप-ान, राहणी आणि धावपळीच्या या काळात पुरुषांमध्ये नपुंसकत्व वाढत आहे. योग्य आहार आणि पोषणाची कमी या कारणामुळे पुरुषांची प्रजनन क्षमता प्रभावित होत आहे.

अशात कमजोरीमुळे दांपत्य जीवनातील आनंद देखील हरवत आहे. तर आज जाणून घ्या नपुंसकत्वासाठी जवाबदार ५ **खाद्य पदार्थांबद्दल:**



**३ शुगर ड्रिंक्स**-शुगर ड्रिंक्स जसे सोडा, एनर्जी ड्रिंक्स आणि कार्बोहायड्रेट ड्रिंक्सचे शौकीन पुरुषांसाठी ही लक्ष देण्यासारखी माहिती आहे की एक दिवसात एकाहून अधिक शुगर आणि कार्बोहायड्रेट ड्रिंक्स पिण्याने स्पर्म क्वालिटीवर प्रभाव पडतो. असे ड्रिंक्स शरीरात शुगर इंसुलिन रजिस्टेंट वाढवून ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस पैदा करतात. ज्यामुळे स्पर्म कमी होतात. **(क्रमशः)**

## विनोद




पोलिसाने रात्रीच्या वेळी त्या माणसाला हटकले. 'रात्रीच्या वेळी तू काय करतो आहेस?' तो माणूस गप्पच उभा राहिला. 'अरे बोल ! इतक्या रात्री यावेळी तू काय करतो आहेस? काहीतरी स्पष्टीकरण दे.' 'मला काही स्पष्टीकरण देता आले असते तर घरी जाऊन मी बायकोसमोरच उभा राहिलो नसतो का?'

## संदेश

Katrina ki Coffee me Ek Macchar gira,
usne wo pee li.

Macchar k Baap ne kuch kaha aur Katrina Behosh ho gai..
.
.
Usne kaha:
Tumhare Pet me Mera Bacha hai..

## सुविचार




अविचाराने कोणतेही काम करु नये कारण ते अनेक आपत्तींना जन्म देतो.

**- भारवि**

अन्यो धर्म: समर्थानामापत्स्वन्यश्च भारता
(शांतीपर्व, अध्याय १३०, ेक १४, महाभारत)

अर्थ - सामर्थ्य असता आचरण्याचा धर्म निराळा आणि संकटप्रसंगीचा धर्म निराळा.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. सट्टा
४. कुणाकडे हा धनाचा असतो तर कुणाकडे गुणांचा!
६. राक्षस
७. नवविवाहितांचा श्रावणसण
१०. चटकन, त्वरित
१२. पक्ष, कड
१३. साजण
१४. जीत
१५. वर्ण, रंग
१७. विठ्ठलपत्नी
१८. बोटाइतके, छोटा तुकडा
२०. मजकुराच्या प्रती बनवणारा
२२. हिरकणीमुळे प्रसिद्धीस आलेला रायगडावरील कडा
२४. वार्ताहर
२६. शाळेत यातून 'वाटावाटी' करतात
२८. धोबी
३०. जमिनीखाली येणारे 'खोड'
३१. उत्सव
३२. संपणे
३४. निवाड्याचे ठिकाण
३६. सरावाने निष्णात
३८. वांगयाचा झणझणीत पदार्थ
४०. दुनिया
४२. नेहमी तय्यार!
४३. नृत्यकलेचे दैवत
४६. दंगामस्ती, मौज
४७. देह, शरीर
४९. ताणल्यास तुटणारे
५१. दोनवेळा म्हटल्यास फारच बडबड!
५३. थरथर
५५. अतर्क्य घटना
५७. धोकादायक (हिंदी)
५९. जेव्हा (संस्कृत)
६१. नट पिळण्याचे साधन
६२. घनघोर युद्ध
६३. डाळीचे कालवण
६४. प्राण्यांचे शस्त्र
६६. वन्य, रानटी
६९. आजीची आजी
७३. कडक व चिवट
७४. धनी
७६. वागणूक
७७. कथेचा गोषवारा
७८. गीत
७९. वाटप
८०. माकडीण
८१. राजकीय आखाड्यात कांदेपोह्याशी टक्कर घेणारा पदार्थ

## उभे शब्द

२. तीट
३. आवाज
४. कोळशाची पूड
५. अपात्र
६. नशीबवान
७. कबूल, संमत
८. भाद्रपदात माहेरी येणाऱ्या ज्येष्ठा-कनिष्ठा
९. चेहऱ्यावरील तेज
११. मान ठेवणे, आदर करणे
१४. जनक राजाची मुलगी, सीता
१६. नूतन
१७अ. 'आला --- समिंदर, त्याला नाही धीर' (ज्योत्सना भोळे यांचे गाजलेले गीत)
१८. बकरा
१९. पूजाअर्चा सांगणारा ब्राह्मण
२०अ. स्थूल
२१. या दोन वेळा चुकवू नयेत अशी जगरहाटी आहे
२३. मला
२४. दूरचा नातेसंबंध
२५. सेवक
२७. श्रीकृष्णाचे वाद्य
२९. लेंगा
३०. श्रीकृष्णाचा मामा
३३. रत्न (हिंदी)
३५. वाहन
३७. बोबडी वळणे
३८. रमताराम
३९. चांदणी
४१. शिडाचे जहाज
४४. ताणलेल्या दोरीचा अवाज
४५. सोन्याचा धागा
४६. पकड!
४८. विनंती, मागणी
५०. अधिकउणे ताकद (हिंदी)
५२. करा घेऊन मिरवणारी
५३. बांगडी, कडे
५४. डोळा
५६. उन्हाची तीव्रता
५८. तमाशातील रूपवती
६०. येऊन पोहोचणे
६१. दूर गेलेला, वंचित
६५. भयानक, भयंकर
६६. पोटातील कृमी
६७. किल्लेदार
६८. नाहकच 'एकाक्ष' म्हणून ओळखला जाणारा पक्षी
७०. डोंगर
७१. वाचन, पारायण
७२. आयुष्य
७३. चणचण
७४. माणूस
७५. सततची मागणी, हट्ट
७८. खेडे, वस्ती

## आडवे उत्तर

१.जुगार ४.खजिना ६.दैत्य ७.मंगळागौर १०.लवकर १२.बाजू १३.माया १४.जय १६.वान १७.रखुमाई १८.बोटभर २०.नकलनवीस २२.टकनक २४.बातमीदार २६.डबा २८.रजक ३०.कंद ३१.सण ३२.सरणे ३४.न्यायालय ३६.सराईत ३८.भरीत ४०.जग ४२.तत्पर ४३.नटराज ४६.धमाल ४७.तया ४९.रबर ५१.बक ५३.कंपन ५५.चमत्कार ५७.खतरनाक ५९.यदा ६१.पाना ६२.रणतुंबळ ६३.वरण ६४.नख ६६.जंगली ६९.खापरपणजी ७३.वातड ७४.मालक ७६.वर्तन ७७.कथानक ७८.गाणे ७९.वितरण ८०.वानरी ८१.वडापाव

## उभे उत्तर

१.गालबोट ३.रव ४.खर ५.नालायक ६.दैववान ७.मंजूर ८.गौराई ९.रया ११.कदर करणे १२.राजस १४.जनककन्या १५.जलद १६.नवीन १७अ.खुषीत १८.बोकड १९.भट २०अ.लठ्ठ २१.तोरणमरण २३.मज २४.बादरायण २५.दास २७.बासरी २९.पायजमा ३०.कंस ३३.रतन ३५.यान ३७.ततपप ३८.भटका ३९.तारा ४१.गलबत ४४.टणत्कार ४५.जर ४६.धर ४८.याचना ५०.बलाबल ५२.करवली ५३.कंकण ५४.नयन ५६.रणरण ५८.नार ६०.दाखल होणे ६१.पारखा ६५.घोर ६६.जंत ६७.गडकरी ६८.काक ७०.पर्वत ७१.पठण ७२.जीवन ७३.वानवा ७४.मानव ७५.लकडा ७८.गाव




## थोडक्यात/ संक्षिप्त

### पवार-फडणवीसांच्या भेटीत काय ठरले? अजिंक्य नाईक म्हणाले...

मुंबई –देशातील क्रिकेट संघटनांपैकी अतिशय प्रतिष्ठेची असलेल्या मुंबई क्रिकेट संघटनेच्या अध्यक्षपदी अजिंक्य नाईक यांनी सलग दुसऱ्यांदा निवड झाली. अध्यक्षपदासाठी यंदा अनेक दिग्गज राजकारणी नेत्यांनी अर्ज दाखल केले होते. परंतु ज्येष्ठ नेते शरद पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बैठकीत योग्य वाटाघाटी करून नाईक यांच्या मार्गातले अडथळे दूर केले गेले. अर्ज माघारी घ्यायला पाच–दहा मिनिटे शिल्लक असताना भाजप नेते प्रसाद लाड, सेना नेते विहंग सरनाईक, क्रिकेटर डायना एडल्जी यांनी अर्ज माघारी घेतले. त्यामुळे अजिंक्य नाईक यांची बिनविरोध निवड झाली.एमसीए ची बिनविरोध निवडणूक कशी झाली? पवार–फडणवीसांच्या भेटीत काय ठरले? अजिंक्य नाईक यांच्या निवडीनंतर त्यांनी पत्रकार परिषद घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यामुळे हे सर्व शक्य झाले असे नाईक म्हणाले. खेळात राजकारण न आणता क्रिकेटच्या दृष्टीने योग्य निवड व्हावी, याकडे त्यांचा कटाक्ष होता. निवडणूक प्रक्रियेत आशिष शेलार यांचेही सहकार्य लाभले. या सर्वांच्या सहकार्यामुळेच निवडणूक बिनविरोध पार पडली, असे अजिंक्य नाईक म्हणाले.मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नेते शरद पवार आणि मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट झाली. यावर बोलताना ते म्हणाले, मुख्यमंत्री फडणवीस आणि शरद पवार या दोघांचेही असे म्हणणे होते की गेले काही काळ काम अतिशय व्यवस्थित सुरू आहे, ते यापुढेही व्यवस्थित सुरू राहावे, ही त्यांची इच्छा होती.

***

### आयपीएल च्या स्टार क्रिकेटरला केले जातेय ब्लॅकमेल, इंटरनॅशनल नंबरवरून मिळतायत धमक्या

दिल्ली,१० नोव्हेंबर (पीएसआय)

दिल्ली कॅपिटल्सचा युवा ऑलराऊंडर क्रिकेटर विप्रज निगम संदर्भात एक मोठी बातमी समोर येत आहे. मैदानावर जबरदस्त प्रदर्शन करणाऱ्या या युवा क्रिकेटरला ब्लॅकमेलिंगचा सामना करावा लागत आहे. त्यांनी पोलिसांमध्ये याबाबत तक्रार दाखल केली असून त्याला आंतरराष्ट्रीय नंबरवरून धमक्या मिळत असल्याचे समोर आले आहे. विप्रज निगम हा मुळत: उत्तर प्रदेशच्या हैदरगढ क्षेत्राचा असून रविवारी विप्रजने कोतवाली पोलीस स्थानकात मिळणाऱ्या धमक्यांबाबत तक्रार दाखल केली. विप्रज निगम हा आयपीएल २०२५ नंतर चर्चेत आला होता, यावेळी त्यांनी दमदार परफॉर्मन्स केला होता.

विप्रजला कोण करतंय ब्लॅकमेल?विप्रज निगमने एका युवतीवर ब्लॅकमेल आणि बदनामीचा आरोप लावला आहे. आयपीएल २०२५ मध्ये केलं दमदार प्रदर्शन : विप्रज निगमने आयपीएल २०२५ मध्ये दिल्ली कपिटल्ससाठी एकूण १४ सामने खेळले. यादरम्यान त्यांनी १७९.७४ च्या स्ट्राईक रेटने १४२ धावा केल्या. याशिवाय त्याने गोलंदाज म्हणून ११ विकेट सुद्धा घेतल्या. विप्रज निगम हा देशांतर्गत सामन्यात उत्तर प्रदेशसाठी खेळतो. त्याने ५ फर्स्ट क्लास आणि ६ लिस्ट ए सामने खेळले आहेत.

***

### हाँगकाँग सिक्सेसचे जेतेपद जिंकल, पण पाकिस्तानची पार इज्जर गेली,

मुंबई –हाँगकाँग सिक्सेस स्पर्धेत जिथे भारतचा प्रदर्शन निराशाजनक ठरला, तिथे पाकिस्तानने दमदार खेळाच्या जोरावर विजेतेपद मिळवण्याचा मान पटकावला. या हंगामातील अंतिम सामन्यात पाकिस्तानने कुवेतचा पराभव करून हा किताब आपल्या नावावर केला. ही सहावी वेळ होती, जेव्हा पाकिस्तानने हाँगकाँग सिक्सेसचे विजेतेपद जिंकले. मात्र, जेतेपद जिंकल्यानंतरही पाकिस्तानच्या संघाची पार इज्जर गेली.खरे तर, फायनल सामन्यानंतर झालेल्या प्रेझेंटेशन समारंभात पाकिस्तानी खेळाडूंच्या इंग्रजी बोलण्यावरून सोशल मीडियावर जोरदार चर्चा रंगली. इतकंच नाही, तर पीसीबीचे मीडिया प्रमुख, त्यांच्या इंग्रजी उच्चारांवरही नेटिझन्स खिल्ली उडवत आहेत. सोशल मीडियावर पाकिस्तानी खेळाडू आणि पीसीबी अधिकाऱ्यांचे इंग्रजी बोलतानाचे व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत.सामन्याबद्दल बोलायचे झाल्यास, ६ षटकांच्या या रोमांचक फायनलमध्ये पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करत १३५ धावा केल्या. कर्णधार अब्बास आफ्रिदीने केवळ ११ चेंडूत ५२ धावा ठोकल्या, ज्यात २ चौकार आणि तब्बल ७ षटकारांचा समावेश होता. त्याला अब्दुल समदने साथ देत १३ चेंडूत ४२ धावा केल्या आणि ५ षटकार ठोकले. ख्वाजा नफयने ६ चेंडूत २२ धावा करून महत्त्वाचे योगदान दिले.कुवेतकडून मीत भावसारने सर्वाधिक तीन बळी घेतले. १३६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना कुवेतची सुरुवात चांगली झाली होती.

## सॅमसनच्या जागी जडेजा? राजस्थान रॉयल्स, चेन्नई सुपर किंग्ज संघांत खेळाडू अदलाबदलीबाबत चर्चा



**नवी दिल्ली:** इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ट्वेन्टी–२० क्रिकेटमधील राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपर किंग्ज संघांत खेळाडू अदलाबदलीवरून चर्चा सुरू असल्याची माहिती आहे. यानुसार यष्टिरक्षक–फलंदाज संजू सॅमसन राजस्थानकडून चेन्नईकडे, तर अनुभवी अष्टपैलू रवींद्र जडेजा चेन्नईकडून राजस्थानकडे जाईल. या करारावर अद्याप स्वाक्षरी करण्यात आलेली नसली, तरी दोन संघांमधील चर्चा अंतिम टप्प्यावर असल्याचे समजते.

'आयपीएल'चा गेला हंगाम संपल्यापासूनच सॅमसन राजस्थान संघ सोडण्यास इच्छुक असल्याची चर्चा होती. सॅमसन आणि राजस्थानचे व्यवस्थापन यांच्यात काही मुद्द्यांवरून मतभेद होता. या वर्षी अमेरिकेतील 'मेजर लीग' ट्वेन्टी–२० स्पर्धा सुरू असताना सॅमसनने चेन्नई सुपर किंग्जच्या व्यवस्थापनातील व्यक्तींची भेटही घेतली होती. तेव्हापासून सॅमसन चेन्नई संघात जाण्यासाठी उत्सुक असल्याच्या चर्चांना सुरुवात झाली होती.

'आयपीएल'च्या नव्या हंगामासाठी संघात कायम ठेवलेल्या आणि संघमुक्त करण्यात आलेल्या खेळाडूंची नावे १५ नोव्हेंबर रोजी जाहीर केली जाणार आहेत. त्याआधी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या जाणे अपेक्षित आहे. मात्र, सॅमसनला समाविष्ट करून घेताना चेन्नई सुपर किंग्ज संघ महेंद्रसिंह धोनीबाबत काय निर्णय घेणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.सॅमसनकडे ४४ वर्षीय धोनीचा उत्तराधिकारी म्हणून पाहिले जात आहे. परंतु धोनी आणखी एक हंगाम खेळेल अशी आपल्याला आशा असल्याचे चेन्नई सुपर किंग्ज फ्रँचायझीचे मुख्य कार्यकारी अधिकारी काशी विश्वनाथन काही दिवसांपूर्वीच म्हणाले होते. मात्र, आता सॅमसनला करारबद्ध करण्यात यश आल्यास धोनीबाबतच्या योजनेत बदल होऊ शकेल.

आयपीएलमध्ये ट्रेडऑफ्स काय असतं? कसा होतो हा व्यवहार? ट्रान्सफर फी काय असते?

आणखी एक खेळाडू?

सॅमसनच्या जागी जडेजा राजस्थानकडे जाणार हे जवळपास निश्चित आहे. परंतु ३६ वर्षीय जडेजा कारकीर्दीच्या अंतिम टप्प्यावर असल्याचे अधोरेखित करताना राजस्थानने चेन्नईकडे आणखी एका खेळाडूची मागणी केली आहे. इंग्लंडचा अष्टपैलू सॅम करनला राजस्थानकडे पाठविण्याची चेन्नईने तयारी दर्शवली आहे. परंतु राजस्थानने श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज मथीशा पथिरानाबाबत विचारणा केली आहे. पथिरानाने गेल्या दोन हंगामात चेन्नईकडून चमकदार कामगिरी केली आहे. त्यामुळे चेन्नईचा संघ त्याला सोडण्यासाठी इच्छुक नाही. अशात करनला समाविष्ट करून घेण्यास राजस्थान सहमती दर्शविणार का, यावर सॅमसन आणि जडेजा यांची अदलाबदल अवलंबून असू शकते.

**दोन्ही खेळाडूंसाठी समान रक्कम**

गेल्या 'आयपीएल' लिलावापूर्वी राजस्थानने सॅमसनला आणि चेन्नईने जडेजाला प्रत्येकी १८ कोटी रुपये देत संघात कायम ठेवले होते. दोन्ही खेळाडूंसाठी समान रक्कम देण्यात आल्याने आता त्यांची अदलाबदल करणे दोन्ही संघांना सोपे जाणार आहे.

राजस्थान रॉयल्सशी चर्चा करण्यापूर्वी चेन्नईने जडेजाचे मत जाणून घेतले होते. माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी, विद्यमान कर्णधार ऋतुराज गायकवाड, प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग आणि व्यवस्थापनातील अन्य सदस्यांनी मिळून जडेजाशी चर्चा केली. जडेजाने राजस्थानकडे जाण्यास आपली हरकत नसल्याचे स्पष्ट केल्यानंतर चेन्नई आणि राजस्थान संघांतील पुढील संवाद सुरू झाला.

राजस्थानचा संघ प्रतिभावंत फिरकी गोलंदाजाच्या शोधात होता. ते जडेजाबाबत आधीपासूनच विचार करत होते.

## मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी अजिंक्य नाईक बिनविरोध निवड




मुंबई : मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी अजिंक्य नाईक यांची बिनविरोध निवड झाली आहे. अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केलेल्या सर्वांनी उमेदवारी मागे घेतल्याने नाईक यांच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला. अशाप्रकारे अजिंक्य नाईक पुन्हा एकदा एमसीएचे अध्यक्ष बनले आहेत.

अध्यक्षपदासाठी जितेंद्र आव्हाड, प्रसाद लाड, मिलिंद नार्वेकर, डायना एडलजी आणि विहंग सरनाईक यांनी अर्ज दाखल केले होते मात्र या सर्वांनी उमेदवारीतून माघार घेतल्याने नाईक बिनविरोध अध्यक्ष झाले.

ता मुंबई क्रिकेट असोसिएशनमधील उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव आणि खजिनदार या पदांसाठी निवडणूक होणार आहे.

मुंबई क्रिकेट असोसिएशनचे तत्कालीन अध्यक्ष अमोल काळे यांचे निधन झाल्यानंतर नाईक अध्यक्ष झाले होते. नंतर आता पुन्हा एकदा त्यांची बिनविरोध अध्यक्षपदी निवड झाली आहे. अजिंक्य नाईक हे २३ जुलै २०२४ रोजी मुंबई क्रिकेट असोसिएशनचे सर्वात तरुण अध्यक्ष बनले होते. वयाच्या ३८ व्या वर्षी अध्यक्षपदी विराजमान होण्याचा मान त्यांनी मिळवला होता.

अध्यक्षपदासाठीची निवडणूक बिनविरोध पार पडल्याने आता इतर पदांसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. ही निवडणूक १२ नोव्हेंबर रोजी होईल. उपाध्यक्षपदासाठी ९, सचिवपदासाठी १०, सहसचिवपदासाठी ९ आणि खजिनदारपदासाठी ८ अर्ज आले आहेत. तसेच कार्यकारिणी सदस्यांसाठी तब्बल ४८ अर्ज दाखल झाले आहेत. पुढील काही दिवसांत या महत्त्वाच्या पदांवर कोणाची वर्णी लागते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पाकिस्तानच्या खेळाडूंनी मारले इंग्रजीचे षटकार




हाँगकाँग : पाकिस्तानने हाँगकाँग सिक्सेस स्पर्धेत शानदार कामगिरी करत विजेतेपदावर आपलं नाव कोरलं आहे. रविवारी खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात पाकिस्तानने कुवेतवर मात करून हा किताब जिंकला. मात्र, विजयाऐवजी पाकिस्तानची टीम सोशल मीडियावर वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे.

पुरस्कार वितरण सोहळ्यात पाकिस्तानी खेळाडू आणि त्यांच्यासोबत असलेले अनुवादक (पीसीबीचे मीडिया अधिकारी) इंग्रजीत जे काही बोलले त्यावरुन ते चेष्टेचा विषय झाले आहे. खेळाडू आणि मीडिया अधिकारी या दोघांचे इंग्रजी अतिशय वाईट असल्याचे कार्यक्रमावेळी दिसून आले. आता याच घटनेचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

ामन्याच्या कामगिरीकडे पाहिलं तर मोहम्मद शहजाद, अब्बास अफरीदी आणि अब्दुल समद यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. ५२ धावा आणि १ विकेट अशी दमदार कामगिरी करणाऱ्या अब्बास अफरीदीला सामनावीर घोषित करण्यात आलं. पाकिस्तानने हाँगकाँग सिक्सेसचा किताब सहाव्यांदा जिंकत इतिहास रचला. याआधी दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडने प्रत्येकी पाच वेळा हा किताब जिंकला होता. त्यामुळे सर्वाधिक वेळा हा किताब जिंकणारा देश म्हणून पाकिस्तानचं नाव नोंदवलं गेलं आहे.अंतिम सामन्यात पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करत अवघ्या ६ षटकांत १३५ धावा केल्या. कर्णधार अब्बास अफरीदीने केवळ ११ चेंडूत ५२ धावा ठोकल्या, ज्यात २ चौकार आणि तब्बल ७ षटकारांचा समावेश होता. अब्दुल समदनेही १३ चेंडूत ४२ धावांची झळाळती खेळी केली, तर ख्वाजा नफयने ६ चेंडूत २२ धावा केल्या.

कुवेतकडून मीत भावसारने सर्वाधिक तीन बळी घेतले. १३६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना कुवैतची सुरुवात चांगली झाली होती. अदनान इदरीस आणि मीत भावसार यांनी पहिल्या विकेटसाठी ३३ धावांची

## भारताच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्याची यशस्वी सांगता, टीम इंडिया पुढील मालिका कुठे खेळणार ?



कोलकाता : भारताच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्याची यशस्वी सांगता झाली. भारताने ऑस्ट्रेलिया विरुद्धची टी ट्वेंटी मालिका २–१ अशी जिंकली. या मालिकेतील पहिला आणि पाचवा सामना पावसामुळे रद्द झाला तर दुसरा सामना ऑस्ट्रेलियाने ४ विकेट राखून जिंकला. यानंतर भारताने तिसरा सामना पाच विकेट राखून तर चौथा सामना ४८ धावांनी जिंकला. या लागोपाठच्या विजयांच्या जोरावर भारताने मालिका खिशात टाकली. आता भारत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध घरच्या मैदानावर खेळणार आहे. दक्षिण आफ्रिकेचा संघ मागील २५ वर्षांपासून भारताला भारतात हरवू शकलेला नाही. यामुळे भारतीय संघ आत्मविश्वासाने दक्षिण आफ्रिकेला सामोरा जाणार असे चित्र आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी भारताचा संघ

शुभमन गिल (कर्णधार), रिषभ पंत (उपकर्णधार आणि यष्टीरक्षक), यशस्वी जयस्वाल, केएल राहुल, साई सुदर्शन, देवदत्त पडिक्कल, ध्रुव जुरेल, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, जसप्रीत बुमराह, अक्षर पटेल, नितीश कुमार रेड्डी, मोहम्मद सिराज, कुलदीप यादव आणि आकाशदीप.

जाणून भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका २०२५ वेळापत्रक

पहिली कसोटी – १४ ते १८ नोव्हेंबर – कोलकाता

दुसरी कसोटी – २२ ते २६ नोव्हेंबर – गुवाहाटी

पहिला एकदिवसीय सामना – ३० नोव्हेंबर – रांची

दुसरा एकदिवसीय सामना – ३ डिसेंबर – रायपूर

तसरा एकदिवसीय सामना – ६ डिसेंबर – विशाखापट्टणम

पहिला टी ट्वेंटी सामना – ९ डिसेंबर – कटक

दुसरा टी ट्वेंटी सामना –११ डिसेंबर, नवं चंडिगड

तिसरा टी ट्वेंटी सामना – १४ डिसेंबर, धरमशाला

चौथा टी ट्वेंटी सामना – १७ डिसेंबर, लखनऊ

पाचवा टी ट्वेंटी सामना – १९ डिसेंबर, अहमदाबाद

## धोनी आयपीएलमधून कधी निवृत्त होणार?



नवी दिल्ली,–पाच वेळा आयपीएल चॅम्पियन राहिलेला कर्णधार महेंद्रसिंग धोनी त्याच्या आयपीएल कारकिर्दीच्या शेवटच्या टप्प्यात आहे. धोनी आयपीएल २०२६ मध्ये खेळण्याची अपेक्षा आहे. त्यातच सोशल मीडियावर पुन्हा एकदा त्याच्या निवृत्तीच्या अफवा पसरत आहेत. चेन्नई सुपर किंग्जचा अनुभवी खेळाडू रवींद्र जडेजा याच्याशी संबंधित ट्रेडच्या बातम्यांदरम्यान, माजी भारतीय खेळाडूनं धोनीच्या निवृत्तीबद्दल एक महत्त्वाचा संकेत दिला आहे. या माजी आयपीएल प्रशिक्षकाने जडेजाच्या ट्रेंडबाबत एक महत्त्वाचं विधान केले आहे.

महेंद्रसिंग धोनी आयपीएलमधून कधी निवृत्त होणार? : ४४ वर्षीय महेंद्रसिंग धोनीच्या आयपीएल कारकिर्दीबद्दल एक महत्त्वाचे विधान करताना, माजी क्रिकेटपटू मोहम्मद कैफने त्याच्या यूट्यूब चॅनलवर म्हटले आहे की, मफजर सॅमसन सीएसकेमध्ये सामील होण्याची शक्यता असेल तर बरेच फोन येतील. संजूने फोन केला असेल. पडद्यामागे, बरेच फोन आले असतील. संजूने सीएसकेला, कदाचित धोनीलाही म्हटले असेल, मतुला काय वाटते, भाऊ?फ पाहा, धोनी संघ चालवतो आणि जर सीएसके यावेळी संजूला संघात घेऊ इच्छित असेल तर तो भविष्यातील कर्णधार देखील आहे. याचा अर्थ असा की हे धोनीचे शेवटचे वर्ष आहे. त्याला संजू का हवा असेल? जडेजा बराच काळ त्यांच्याकडून खेळत आहे.रवींद्र जडेजाबद्दल काय म्हणाला मोहम्मद कैफ : माजी भारतीय खेळाडू मोहम्मद कैफचा असा विश्वास आहे की धोनी जडेजाचा त्याग करु शकतो. जडेजाच्या कामगिरीच्या वृत्तांबाबत कैफ म्हणाला, मफधोनीसाठी, संघाचं सर्वात मोठं ध्येय जिंकणे आहे. जर तो परतला तर तो विचार करेल की चेन्नई सुपर किंग्ज गेल्या वर्षी क्रमवारीत १० व्या स्थानावर होता. तो एक अभिमानी माणूस आहे, म्हणून त्याचे सर्वात मोठे ध्येय संघासाठी आणखी एक ट्रॉफी जिंकणे असेल. एका खेळाडूच्या बळावर कोणताही संघ ट्रॉफी जिंकू शकत नाही. जर संघाच्या भल्यासाठी जडेजाला बलिदान द्यावं लागलं तर धोनी ते करेल.

# मुंबई क्रिकेट संघटनेच्या अध्यक्षपदी पुन्हा अजिंक्य नाईक; प्रसाद लाड

मुंबई–मुंबई क्रिकेट संघटनेचे (एमसीए) विद्यमान अध्यक्ष अजिंक्य नाईक यांचा आपल्या पदावर कायम राहण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. 'एमसीए'च्या बुधवारी (१२ नोव्हेंबर) होणाऱ्या त्रैवार्षिक निवडणुकीत अध्यक्षपदासाठी एकूण आठ जणांनी अर्ज दाखल केले होते. मात्र, सोमवारी (१० नोव्हेंबर) अर्ज मागे घेण्यासाठी देण्यात आलेल्या अखेरच्या दिवशी अजिंक्य नाईक वगळता सर्वच उमेदवारांनी अध्यक्षपदाच्या निवडणुकीतून माघार घेतली. त्यामुळे नाईक यांना 'एमसीए' अध्यक्ष म्हणून सलग दुसरा कार्यकाळ मिळणार हे स्पष्ट झाले.

कोण होते इच्छुक?

### मिलिंद नार्वेकरांसह अन्य उमेदवारांचे अर्ज मागे

'एमसीए' अध्यक्षपदासाठी नाईक यांच्यासह भारताच्या माजी कर्णधार डायना एडल्जी, भाजप आमदार प्रसाद लाड, शिवसेनेचे (ठाकरे गट) आमदार मिलिंद नार्वेकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) आमदार जितेंद्र आव्हाड, राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे पुत्र आणि मुंबई ट्वेन्टी–२० लीगचे अध्यक्ष विहंग सरनाईक, 'एमसीए'चे माजी सहसचिव शाहआलम शेख आणि कार्यकारी परिषदेचे सदस्य सुरज समत यांनी अर्ज दाखल केले होते. मात्र, सोमवारी नाईक वगळता सर्व उमेदवारांनी आपापले अर्ज मागे घेतले.

उपाध्यक्षपदासाठी आव्हाड?



आव्हाड अध्यक्षपदाच्या शर्यतीतून बाहेर पडले असले, तरी ते उपाध्यक्षपदासाठी उत्सुक आहे. या पदासाठी त्यांच्यासमोर ठाण्याच्या यंग स्टार्स क्रिकेट क्लबकडून अर्ज दाखल केलेल्या नवीन शेट्टी यांचे आव्हान असेल. उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष यासह अन्य सर्व पदांसाठी, तसेच कार्यकारी परिषदेच्या सदस्यत्वासाठी बुधवारी निवडणूक होणार आहे.



निवड वादात?

'एमसीए' निवडणुकीवरून आधी वादही निर्माण झाला होता. 'एमसीए'चे माजी कार्यकारिणी सदस्य श्रीपाद हळबे यांच्यासह अन्य सदस्यांनी या निवडणूक प्रक्रियेविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. घटनेचे उल्लंघन होणे आणि नियमबाह्यपणे १५५ हून अधिक क्रिकेट क्लबना मतदार यादीत समाविष्ट केल्याचा आरोप करून याचिकाकर्त्यांनी या निवडणुकीला आव्हान दिले होते. मात्र, उच्च न्यायालयाने निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यास नकार देताना काही अटींसह पुढील कार्यवाहीस परवानगी दिली. त्यामुळे ही निवडणूक ठरल्याप्रमाणे होत आहे.

## दत्ताजीराजे यांच्या समाधीस अभिवादन



**निलंगा/आयुब बागवानः** दत्ताजीराजे जाधवराव यांच्या स्मृतिदिनानिमित्त निलंगा तेथील समाधीस्थळी समाधी पूजन व अभिवादन करण्यात आले.

येथील राजे लखुजीराव जाधवराव यांचे नातू, राजमाता जिजाऊ आऊसाहेब यांचे भाचे व छत्रपती शिवाजी महाराज यांचे मामेभाऊ दत्ताजीराजे बहादुरजीराजे जाधवराव यांचा ३६० वा स्मृतिदिन निलंगा येथील जंगम बसय्या मठ परिसर अशोक नगर येथील समाधीस्थळी समाधी पूजन करून साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी विशेष म्हणून लखुजीराजे जाधवराव यांचे १७ वे वंशज डॉ. नरेशराजे जाधवराव उपस्थित होते यावेळी त्यांनी दत्ताजीराजे जाधवराव यांचा इतिहास उलगडून सांगितला व समाधी परिसरातील ऐतिहासिक माहिति दिली. याप्रसंगी भाजपा प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव एम एम जाधव, जिल्हा संघटक विनोद सोनवणे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रमोद कदम, उदय निटुरे, सुबोध गाडीवान, सचिन नाईकवाडे, हंसराज शिंदे, शिवाजी भंडारे,गोविंद इंगळे, मनोज कोल्ळे, शेषराव ममाळे,अंकुश ढेरे, पिंटू पाटील, रवी फुलारी, दत्ता मोहळकर,अविराज पाटील,सुमित ईनानी,हरिभाऊ सगरे,प्रकाश पटने,मारुती नागदे,संदीप कांबळे, संतोष मोघे आदींनी उपस्थित राहून स्मृतिदिनानिमित्त समाधी पूजन करून अभिवादन केले.

## दिव्यांगांप्रती संवेदनशीलता व जाणीव जागृतीसाठी मंगळवारी जिल्हास्तरीय कार्यशाळा

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा प्रशासन व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ कलम ३९ अन्वये दिव्यांगांप्रती संवेदनशीलता व जाणीव जागृतीसाठी मंगळवार, ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात ही कार्यशाळा होईल.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे राहणार असून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधिक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे. जिल्हा न्यायालयाचे ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. श्रीराम देशपांडे, केंद्रीय सल्लागार मंडळाचे सदस्य सुरेश पाटील, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यलयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे, जिल्हा दिव्यांग पुनर्वसनचे कार्यवाहक डॉ. योगेश निटुरकर यांचीही उपस्थिती राहणार आहे.

या कार्यशाळेत दिव्यांगांच्या विविध कायदेविषयक बाबीवर चर्चा व मार्गदर्शन होणार आहे. या कार्यशाळेला जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी केले आहे.

## लातूरमध्ये लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त एकता पदयात्रेचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** लोहपुरुष म्हणून ओळखले जाणारे भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त लातूर शहरात युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय भारत सरकार अंतर्गत कार्यरत माय भारत, राष्ट्रीय सेवा योजना व जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर येथे पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही पदयात्रा १२ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ७:३० वाजता लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथून निघणार आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आल्यानंतर पदयात्रेचा समारोप होईल.

शहरातील विविध भागातून नागरिक, विद्यार्थी, तसेच सामाजिक संस्था यात सहभागी होणार आहेत. या उपक्रमाद्वारे सरदार पटेल यांच्या कार्याची महती जनतेपर्यंत पोहोचवण्याचा आणि त्यांच्या 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या विचारांना चालना देण्याचा प्रयत्न असून भारताच्या ऐक्यासाठी कार्य केलेल्या लोहपुरुषाला आदरांजली वाहण्यासाठी प्रत्येक नागरिकाने या पदयात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी शशांक रावूला, जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

## 'आई, उशीर होईल'... असे सांगून गेलेला मुलगा परतलाच नाही; मालाडमध्ये डम्परच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**मुंबई/प्रतिनिधी :** मालाड परिसरातील शनिवारी मध्यरात्री घडलेल्या या अपघाताने संपूर्ण परिसराला हादरवून सोडलं आहे. फक्त २२ वर्षांचा निखिल हा आयुष्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात असलेला हा उत्साही तरुण एका क्षणात सगळं काही गमावून बसला. नेमकं निखिल बाबतीत काय घडलं ते जाणून घेऊयात

मिळालेल्या माहितीनुसार, निखिल कद्रे हा आरे कॉलनीत कुटुंबियासोबत वास्तव्यास आहे. शनिवारी (तारीख.८)रात्री निखिल त्याच्या मित्रासोबत (सुमित खैरनार) जेवण करण्यासाठी बाहेर पडला होता. पण तो पुन्हा कधीच घरी परतणार नाही, याची कल्पना सुद्धा कुणालाच नव्हती.

दोघही मित्र पश्चिम द्रुतगती मार्गावरील मालाड पठाणवाडी उड्डाणपुलावरुन जात होते. अचानक तिथे डम्परचालकाने अचानक घेतलेल्या वळणामुळे त्यांची दुचाकी थेट डम्परला धडकली आणि काही क्षणांतच सगळं संपलं. अपघात इतका भीषण होता की जवळच्या लोकांनी त्यांना जोगेश्वरीच्या रुग्णालयात दाखल केल, पण डॉक्टरांनी निखिलला मृत घोषित केलं.

घडलेल्या या घटनेत निखिलचा मित्र सुमित वाचला आहे. निखिलच्या निधनाने कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. घरातील तरुण मुलगा गमावल्याच्या वेदनेत आईवडील शब्दही उच्चारू शकत नाहीत तर मित्रपरिवारही हादरला असून सोशल मीडियावर सर्वजण त्याला श्रद्धांजली वाहत आहेत.

या अपघातानंतर डम्परचालकाच्या ड्रायव्हिंगचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. रोजच रस्त्यावर अशा प्रकारे निष्काळजीपणे वाहन चालवणाऱ्यांमुळे कित्येक कुटुंबांचं आयुष्य उद्ध्वस्त होतंय.

# विश्वधर्मी मानवता तीर्थभवनातून निघणारा संदेशच जगाला विनाशापासून वाचवेल - डॉ. विश्वनाथ कराड

## 'विश्वशांतीची महागाथा' व 'सुवर्णपिंपळ' ग्रंथाचे प्रकाशन

**लातूर/प्रतिनिधी :** ''भारतीय संस्कृतीचे वसुधैव कुटुंबकम् व एकं सत् विप्रा बहुदा वदंती हा संदेशच जगाला विनाशापासन वाचवू शकतो. हाच संदेश रामेश्वर रूई येथे साकारलेल्या एकमेवाद्वितीय अशा 'विश्वधर्मी मानवतातीर्थ भवना' च्या माध्यमातून संपूर्ण जगाला देण्याचा छोटासा प्रयत्न आहे. विज्ञान आणि अध्यात्माच्या समन्वयातूनच जगात शांती नांदेल अशी श्रध्दा आणि पूर्ण निष्ठा आहे.'' असे विचार विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी व्यक्त केले.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे भारत व मानवता तीर्थ रामेश्वर रुई यांच्या संयुक्त विद्यमाने जगातील सर्वात मोठ्या आणि विस्तीर्ण दालन असलेल्या 'विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनात' लेखक लक्ष्मण सूर्यभान घुगे यांच्या लेखणीतून विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या ज्ञान, विज्ञान आणि अध्यात्माची प्रयोगशाळा या संकल्पनेवर आधारीत 'विश्वशांतीची महागाथा' व संत श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या संघर्षमय जीवनाचं सुंदर आख्यान महाकादंबरी 'सुवर्णपिंपळ' या ग्रंथांचे प्रकाशन विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड आणि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रगतशील शेतकरी काशीराम दा. कराड, डॉ. हनुमंतराव कराड, वरिष्ठ सल्लागार गिरीश दाते, संचालक डॉ. महेश थोरवे, डॉ. राऊत आणि योगेश पारखी उपस्थित होते.

डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले,'' सध्या संपूर्ण जगात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सर्व सुख सुविधांसह झालेली पराकोटीची भौतिक प्रगती असूनसुद्धा दुसरीकडे हिंसा, रक्तपात, द्वेष, गोंधळ, अराजकता, जातीधर्मातील तेढ, देशांच्या सीमा या सारख्या क्षुल्लक कारणांमुळे अत्यंत संशय, भिती व तणावाचे वातावरण निर्माण झालेले दिसून येते. आशा वेळेस रामेश्वर रुई येथे उभारण्यात आलेल्या विश्वधर्मी मानवतातीर्थ भवनातून संपूर्ण जगाला शांतीचा संदेश देण्यात येत आहे.''



गिरीश दाते म्हणाले,'' विज्ञानाच्या पायावर उभे राहून अध्यात्माचा दिवा पेटवणारे विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी ज्ञानेश्वर माऊलींच्या विचारांना स्वामी विवेकानंदांच्या तत्वधारेचा शेला बांधून विश्वशांती महायज्ञाचा आरंभ केला. त्यांनी विज्ञानाच्या शक्तिरूप हातात अध्यात्माच्या हृदयातला करुण रस सोपवला आहे. यातून विश्वशांती घडावी हे त्यांचे स्वप्न आता सत्यात उतरतांना दिसत आहे.''

डॉ. महेश थोरवे म्हणाले,'' विश्वशांती या संकल्प यात्रेचे शांतीदूत म्हणजे विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड आहेत. त्यांचा एकूणच प्रवास ज्ञान, विज्ञान आणि अध्यात्म या तत्वमालेशी संवाद साधणारा आहे. त्यांनी रामेश्वर रुई या जन्मगावी बौद्ध विहार, मुस्लिम बांधवांसाठी मशीद उभारली, रामसेतू बांधला तसेच आता विश्वधर्मी मानवतातीर्थ भवनाची उभारणी केली आहे. त्यांचे हे कार्य अद्वितीय आहे.''

लेखक लक्ष्मण सूर्यभान घुगे म्हणाले,''जग हे तंत्रज्ञानाच्या वेगाने एक विशिष्ट मार्गावरुन धावत आहे. याच महामार्गावरून प्रवास करताना प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी या वेगाला दिशा देणारा आत्मा नेमका कुठे आहे याचे मर्म जाणले. आयुष्यात परिवर्तन घडवून ज्ञानाची अद्भुत मंदिरं उभे केली. शिक्षण संस्था हे ज्ञान, विज्ञान आणि अध्यात्माची प्रयोगशाळा म्हणून उभी केली. त्यांनी सर्व धर्मातल्या माणसांना माणुसकीच्या सुंदर धाग्यांनी आणि स्वर बंधाने जोडले आहे.'' योगेश पारखी यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

## अमरावती येथे महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा

### दि. १२ ते १५ नोव्हेंबर दरम्यान होणार स्पर्धा : ११६० खेळाडूंचा सहभाग

**मुंबई/प्रतिनिधी :** महावितरण कंपनीच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन अमरावती येथील श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रीडा संकुलात दि. १२ ते १५ नोव्हेंबर दरम्यान करण्यात आले आहे. या स्पर्धेत १६ परिमंडलातील ११६० खेळाडू आठ संघाच्या माध्यमातून सहभागी होणार आहेत.




वीज कर्मचाऱ्यांच्या क्रीडा कौशल्याला वाव देण्यासाठी महावितरणमध्ये दरवर्षी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यंदाच्या स्पर्धेचे यजमानपद अमरावती परिमंडलाकडे आहे. या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन बुधवारी (दि. १२) सकाळी ९.१५ वाजता महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक (संचालन/प्रकल्प) श्री. सचिन तालेवार राहतील तर प्रमुख पाहुणे म्हणून सहव्यवस्थापकीय संचालक श्री. दिलीप जगदाळे (कोकण प्रादेशिक विभाग) व श्री. आदित्य जीवने (छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभाग), संचालक श्री. अनुदीप दिघे (वित्त), श्री. योगेश गडकरी (वाणिज्य) व श्री. राजेंद्र पवार (मानव संसाधन) तसेच आयोजन समितीचे अध्यक्ष व नागपूर प्रादेशिक संचालक श्री. परेश भागवत, स्पर्धेचे मुख्य समन्वयक व मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके उपस्थित राहणार आहेत.

या स्पर्धेत क्रिकेट, बॅडमिंटन, टेबल टेनिस, टेनिक्वाईट, कॅरम, कबड्डी, व्हॉलीबॉल, खो-खो, ॲथलेटिक्स, कॅरम आणि ब्रिज आदी २२ क्रीडा प्रकारांचा समावेश असून वैयक्तिक व सांघिक खेळ प्रकारातील विजेते व उपविजेत्यांना अनुक्रमे सुवर्ण व रौप्यपदकांनी गौरविण्यात येणार आहे. तसेच स्पर्धेतील सर्वसाधारण विजेत्या संघाला अजिंक्यपदाचा करंडक प्रदान करण्यात येईल. या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धे चा पारितोषिक वितरण कार्यक्रम शनिवारी (दि. १५) दुपारी ५ वाजता श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रीडासंकुलात होणार आहे.

या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या आयोजनासाठी मुख्य अभियंता व आयोजन समितीचे कार्याध्यक्ष श्री. अशोक साळुंके, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी व आयोजन समितीचे सचिव श्री. मधुसूदन मराठे तसेच विविध समित्या पुढाकार घेत आहेत.

## सावित्रीच्या लेकीची दररोज होणारी पायपीट आता कायमस्वरूपी मिटणार

### गोसावी वूमेन्स विंगच्या वतीने विद्यार्थिनीला सायकलचे वाटप



**लातूर/प्रतिनिधी** :गोसावी वूमेन्स विंग या संस्थेने गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मदतीचा कार्यक्रम आयोजित केला. हा कार्यक्रम रविवार दि. ९ नोव्हेंबर ऑगस्ट रोजी हॉटेल अतिथी येथे पार पडला. संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा (मीरा) धर्मवीर भारती आणि उपाध्यक्षा अलका अंबादास गोसावी, रक्षिता गिरी, सुषमा पुरी, जयश्री गिरी, माया पुरी, मीनाक्षी गिरी, मनीषा गोसावी, संगीत गिरी , वैशाली गिरी, वर्षा बन, मनीषा गोसावी, अश्विनी गिरी, रंजना गिरी, डॉ. भागीरथी पुरी, भाग्यश्री गिरी , सुजाता गिरी, मनीषा सागर, मनीषा भारती, पार्वती भारती, सारिका गिरी , निर्मला गिरी, सत्यभामा पुरी, अंजली गोसावी, अश्विनी पुरी, मनीषा पुरी, प्रतिभा बन, अलका गिरी, रोहिणी सागर, संध्या भारती, प्रिया भारती, जयश्री गिरी, लता गिरी, अंजली पुरी यांच्या हस्ते ८ वी विज्ञान शाखेत शिकणाऱ्या कु. शरयू बालासाहेब गिरी या विद्यार्थिनीला सायकल देण्यात आली. यामुळे तिच्या शिक्षणाच्या प्रवासाला गती मिळणार आहे तसेच इतर अनेक गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्यात आली.

संस्थेची सुरुवात केवळ १० महिलांनी केली होती, पण आज ती ६५ सक्रिय सदस्यांपर्यंत पोहोचली आहे. महिला सक्षमीकरण आणि समाजसेवेच्या ध्येयाने कार्यरत असलेली ही संस्था दरमहा समाजहिताचे कार्यक्रम आयोजित करते. संस्थेच्या या उपक्रमामुळे गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी चालना मिळत आहे.

## लातूर ग्रामीण मधील १५ अंगणवाडी इमारत बांधकामासाठी १ कोटी ६८ लाखाचा निधी

**लातूर/प्रतिनिधी :** ग्रामीण विधानसभा मतदार संघातील १५ नवीन अंगणवाडी इमारतीच्या बांधकामासाठी भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून १ कोटी ६८ लक्ष रुपयांचा निधी जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत २९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या आदेशान्वये मंजूर झाला आहे. सदरील निधी मंजूर झाल्याने दुरावस्था झालेल्या अंगणवाड्याचे रूपडे बदलणार आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील अनेक गावातील अंगणवाड्याची दुरावस्था झाल्याने त्या ठिकाणी नव्याने अंगणवाडी इमारतीचे बांधकाम करण्यात यावे याकरिता भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. आ. रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे लातूर ग्रामीण मतदार संघातील १५ ठिकाणच्या अंगणवाडीचे नव्याने इमारत बांधकामासाठी १ कोटी ६८ लक्ष रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. प्रत्येक अंगणवाडीला ११ लक्ष २५ हजार रुपये एवढा निधी प्राप्त होणार असून या निधीतून दुरावस्था झालेल्या अंगणवाडीचे स्वरूप बदलून अत्यंत देखणी इमारत उभी राहणार आहे.

जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत मंजुरी मिळालेल्या १५ ठिकाणच्या नवीन अंगणवाडी इमारत बांधकामात लातूर तालुक्यातील ६, रेणापूर तालुक्यातील ३ आणि भादा सर्कल मधील ६ अंगणवाडीचा समावेश आहे. त्यात लातूर तालुका - शिऊर क्रमांक दोन, चिंचोली ब क्रमांक एक, खुलगापूर क्रमांक दोन, मुरुड क्रमांक चार, मुरुड क्रमांक दहा, रेणापूर तालुक्यातील - सेलू खुर्द, कामखेडा, सुकणी आणि भादा सर्कल मधील रिंगणी क्रमांक एक,



वडजी क्रमांक एक, भादा क्रमांक तीन, शिवली क्रमांक तीन, वरवडा क्रमांक एक, समदर्गा येथील अंगणवाडीच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी मान्यता मिळाली आहे.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी विविध गावातील अंगणवाडीच्या नवीन इमारती बांधकामासाठी १ कोटी ६८ लक्ष रुपयाचा निधी मिळवून दिल्याबद्दल त्या त्या गावातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह अंगणवाडीच्या मदतनीस, सेविका आणि पालकांनी आ. रमेशआप्पा कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## मुंबईला मिळणार वाहतुकीचा 'तिसरा पर्याय'

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेला मेट्रो आणि कोस्टल रोडनंतर आता तिसरा नवा पर्याय मिळणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) एकात्मिक भूमिगत रस्त्यांचे जाळे उभारण्यासाठी नियोजन सुरू केले आहे. शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी हे नेटवर्क विकसित केले जाणार असून, ते रस्ते, रेल्वे, मेट्रो, विमानतळ आणि बुलेट ट्रेन मार्गांना परस्परांशी जोडणार आहे. या प्रकल्पामुळे पूर्व-पश्चिम आणि उत्तर-दक्षिण दिशांतील जोडणी अधिक सक्षम होईल, प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल आणि वाहतूक कोंडीत मोठी घट होईल. 'मुंबई इन मिनिट्स' या संकल्पनेला मूर्त रूप देणारा हा प्रकल्प नेमका कसा असेल आणि मुंबईकरांना त्याचे काय फायदे मिळतील, याचा सविस्तर आढावा.

एकात्मिक भूमिगत रस्ते प्रकल्प तीन टप्प्यांत राबवला जाणार आहे. यातून रस्ते आणि मेट्रो यांना पूरक असे एकात्मिक वाहतूक नेटवर्क (इंटिग्रेटेड) तयार होईल, ज्यामुळे प्रवासाचा कालावधी कमी होईल, प्रदूषणात घट होईल आणि कार्यक्षमतेत वाढ होईल. मुंबईतील दाटीवाटीची घरे, इमारती आणि मर्यादित जागा लक्षात घेता भूमिगत मार्ग ही वाहतुकीची क्षमता वाढवण्यासाठी सर्वाधिक

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# श्री कॉम्प्युटर्स व समर्थ क्लासेसच्या वतीने पुनम वाघमारेचा सत्कार



तुळजापूर(विजय पिसे)- नळदुर्ग तालुक्यातील जळकोट येथील वैद्यकीय प्रवेश पात्र परीक्षा उत्तीर्ण होऊन बी .ए. एम. एस अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळविण्याचा मान मिळवल्याबद्दल पुनम संतोष वाघमारे या विद्यार्थ्यांचा श्री कॉम्प्युटर्स व समर्थ क्लासेसच्या वतीने शाल, हार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या यशाबद्दल जळकोट गावचे व आपल्या पालकाचे नाव उज्वल केल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे .या विद्यार्थिनीने ग्रामीण भागातून यशाचा मान मिळवत विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. यावेळी या कार्यक्रमास श्री कॉम्प्युटरचे संचालक लक्ष्मीकांत पाटील तसेच समर्थ क्लासेसचे संचालक रामशेट्टी पाटील , तुकाराम साखरे सर, पत्रकार विजय पिसे, संतोष वाघमारे,सदाशिव हासुरे, श्रीधर भांगे, तुकाराम बिराजदार, विनोद गंगणे, राहुल वाघमारे, सागर हासुरे, नागनाथ भांगे, तानाजी चव्हाण आधी मान्यवर उपस्थित होते.

# धाराशिव जिल्हा शस्त्रांग मार्शल आर्ट असोसिएशनच्या अध्यक्षपदी सुनिल नागणे, सचिव संतोष कदम





धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव जिल्हा शस्त्रांग मार्शल आर्ट असोसिएशनच्या अध्यक्षपदी सुनिल नागणे (तुळजापूर) तर सचिवपदी संतोष दत्ता कदम (कळंब) यांची निवड करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. सोपानराव शेजवळ यांनी निवडीचे पत्र नूतन अध्यक्ष नागणे व कदम यांना दिले आहे.

शस्त्रांग मार्शल आर्ट खेळाचा प्रचार प्रसार करणे, शासनाच्या माध्यमातून जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करणे, मुलींसाठी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण आयोजित करणे असा मानस नवनियुक्त अध्यक्ष सुनिल नागणे यांनी व्यक्त केला.

तसेच संघटनेच्या माध्यमातून शहरी व ग्रामीण भागात शालेय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देवून उत्कृष्ट खेळाडू घडविणार असल्याचेही नूतन जिल्हाध्यक्ष नागणे यांनी सांगितले.

या निवडीचे जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरणाळे यांनी तसेच तुळजापूर, कळंब तालुक्यासह धाराशिव जिल्ह्यातील क्रीडा, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी स्वागत केले आहे.

# अल्पसंख्यांक शाळांसाठी शासन अनुदान - जिल्ह्यातील संस्थांकडून १४ नोव्हेंबरपर्यंत प्रस्ताव मागविले

धाराशिव (जिमाका)- अल्पसंख्यांक विकास विभागाकडून राज्यातील धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित,विना अनुदानित,कायम विना अनुदानित शाळा,कनिष्ठ महाविद्यालये,औद्योगिक प्रशिक्षण संस्था,नगरपालिका / नगरपरिषद शाळा तसेच दिव्यांग शाळांमध्ये पायाभूत सोयीसुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत पात्र शाळांची शासनास अनुदानाकरिता शिफारस करण्यासाठी जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

अल्पसंख्यांक विकास विभागाच्या ७ ऑक्टोबर २०१५ च्या शासन निर्णयानुसार विहीत निकषांप्रमाणे ही योजना सन २०२५-२६ या वर्षासाठी जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे.

त्यानुषंगाने,या योजनेंतर्गत सन २०२५-२६ या वर्षासाठी अनुदान मिळवू इच्छिणाऱ्या जिल्ह्यातील अल्पसंख्यांक शाळांनी १४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव यांचेकडे विहीत नमुन्यातील प्रस्ताव सादर करावेत,

सद्यस्थितीत या योजनेंतर्गत अल्पसंख्यांक शाळांना प्रस्ताव सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे.त्यानुसार,खाली नमूद केलेल्या दिनांकांपूर्वी शाळांनी आपले प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव येथे सादर करावेत.

सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठीचा कालबद्ध कार्यक्रम :

इच्छुक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख १४ नोव्हेंबर २०२५ आहे.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासनास प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख १५ डिसेंबर २०२५ आहे.

वरीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार जिल्ह्यातील अनुदान मिळवू इच्छिणाऱ्या सर्व अल्पसंख्यांक शाळांनी त्यांचे प्रस्ताव विहीत मुदतीतच सादर करावेत.विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत,याची नोंद घ्यावी.

# प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे आयशर क्र एमएच ११ ए.एल. ७०९२ चा चालकाने दि.०९.११.२०२५ रोजी ०६.५० वा. सु.भुम ते पार्डी रोडवर पारडी घाटाचे वरती पार्डी फाटा येथे आयशर टॅम्पो मध्ये गोवंशीय जातीचे ११ जर्शी गायी एकुण १,६५,००० किंमतीच्या वाहनासह ५,६५,००० किंमतीचे गोवंशीय जातीचे जर्शी गायी त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना वाशी पोलीसांना मिळून आले.

यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१),११(१)(ए),११ (१) (एफ), ११(१)(एच), ११(१)(आय) सह कलम ५(अ),५(बी), ९(ब), ११ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सह प्राण्याचे परिवहन नियम कलम ४७,५४,५६ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# महिला सक्षमीकरणासाठी भाजपा हाच खरा पर्याय - आमदार राणाजगजितसिंह पाटील



धाराशिव (प्रतिनिधी) :धाराशिव जिल्ह्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला मोठा धक्का बसला आहे. आक्रमक शिवसैनिक म्हणून ओळख असलेल्या सगुनाताई आचार्य यांच्यासह शहरातील शेकडो महिलांनी भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला आहे. हा कार्यक्रम धाराशिव येथील भाजप कार्यालयात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

सदरील पक्ष प्रवेश हा भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, जिल्हा प्रवक्ते ॲड.नितीन भोसले, भाजपा शहराध्यक्ष अमित शिंदे, भाजपा महिला जिल्हाध्यक्ष प्रितीताई कदम,भाजपा महिला माजी जिल्हाध्यक्ष नंदाताई पुनगुडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पक्षप्रवेश पार पडला.

हा पक्षप्रवेश युवा नेते कुणाल निंबाळकर आणि बालाजी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला असून यावेळी शहरातील असंख्य महिलांनी भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला यावेळी प्रवेश करणाऱ्या महिलांचा मोठा उत्साह पाहायला मिळाला.

पक्षप्रवेश वेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष गोदावरीताई केंद्रे, वंदनाताई डोके, तसेच पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सगुनाताई आचार्य यांच्या सोबत प्रवेश करणाऱ्या प्रमुख महिलांमध्ये मनिषाताई गोवर्धन, वंदना तीते, लता आगळे, स्वाती कुलकर्णी, अलका महाजन, अनुताई मगर, चंद्रकला घोडके, अमृता पवार, मंजिरी चिंचपुरकर, आरती कुलकर्णी आदींचा समावेश आहे.

या प्रसंगी आमदार राणाजगजीतसिंह पाटील म्हणाले की, महिलांना सक्षम करण्याचे धोरण भारतीय जनता पक्षाचे असून पक्षात सर्वसामान्य महिलेलाही न्याय आणि सन्मान मिळतो. महिलांच्या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देत भाजपा त्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडवते. त्यामुळे भाजपा हा जनतेचा, विशेषतः महिलांचा, खरा पक्ष आहे. कार्यक्रमात बोलताना सगुणाताई आचार्य म्हणाल्या की, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात महिलांचे मोठे संघटन उभे राहात आहे. जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष अर्चनाताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिला संघटन भाजपा मजबूत करण्यासाठी तळागाळात काम करत आहे.

या प्रवेश सोहळ्यात युवा नेते कुणाल निंबाळकर आणि बालाजी जाधव यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, महिलांच्या सक्रीय सहभागामुळे धाराशिव जिल्ह्यात भाजप आणखी बळकट होईल. पक्षाच्या विचारसरणीशी जोडलेली प्रत्येक महिला ही नव्या परिवर्तनाची दिशा ठरेल.

भाजपच्या ध्येयधोरणावर विश्वास ठेवून झालेला हा प्रवेश सध्या धाराशिवच्या राजकारणात मोठी चर्चा निर्माण करणारा ठरत आहे.

## विविध प्रकल्प व योजनांचा आढावा

# यंत्रणांनी विविध प्रकल्प व विकास कामे विहित मुदतीत पूर्ण करावी - पालक सचिव श्रीमती अंशू सिन्हा




धाराशिव, जिमाका)जिल्ह्यातील नागरिकांचे जीवनमान उंचावले पाहिजे. दरडोई उत्पन्न देखील वाढले पाहिजे. आकांक्षित जिल्ह्याची ओळख मिटवण्यासाठी आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्ह्यातील विविध प्रकल्प आणि विविध विकासकामे यंत्रणांनी मुदतीत पूर्ण करावी.असे निर्देश वस्त्रोद्योग, सहकार व पणन विभागाच्या प्रधान सचिव तथा पालक सचिव श्रीमती.अंशू सिन्हा यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात ७ नोव्हेंबर रोजी विविध यंत्रणांचा आढावा घेताना श्रीमती सिन्हा बोलत होत्या. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती शोभा जाधव,जि.प.चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.निलेश काळे,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अनुप शेंगुलवार,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर, जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्रीमती सिन्हा म्हणाल्या की,जिल्ह्यात यावर्षी सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे शेतपिकांचे, सार्वजनिक व खाजगी मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे.अतिवृष्टी व पूरबाधित शेतकऱ्यांना मदत करण्यात येत आहे. कोणताही बाधित हा मदतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. संबंधितांच्या बँक खात्यात शासनाकडून देण्यात येणाऱ्या मदतीची रक्कम वेळेत जमा करण्यात यावी.शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन दयावे.जिल्ह्यातील शेतकरी हा मोठ्या प्रमाणात रेशीम शेतीकडे वळला पाहिजे, यासाठी चालना देण्यात यावी.तसेच मागील वर्षी पडलेल्या अवेळी पाऊस आणि गारपिटीमुळे नुकसान झालेल्या शेती पिकांच्या अनुदानाची मदत वाटप शेतकऱ्यांच्या खात्यात वेळेत जमा करावी. ज्या शेतकऱ्यांची ई-केवायसी करणे प्रलंबित असल्यामुळे मदत करता आलेली नाही,त्या शेतकऱ्यांची पोर्टलवरील प्रलंबित ई-केवायसी त्वरित पूर्ण करावी,असे श्रीमती. सिन्हा म्हणाल्या.

जिल्ह्यातून जाणाऱ्या शक्तिपीठ महामार्गासाठी ज्या गावातील शेतकऱ्यांचे भूसंपादन करावयाचे आहे,त्यासाठी संबंधित शेतकऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांना भूसंपादनासाठी प्रोत्साहित करावे,असे सांगून श्रीमती सिन्हा म्हणाल्या की,त्यामुळे राज्य शासनाचे महत्त्वपूर्ण प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यास मदत होणार आहे.श्री जिल्ह्यातून जाणारे राष्ट्रीय महामार्ग व रेल्वे प्रकल्पाच्या अनुषंगाने प्रलंबित असलेली कामे प्राधान्याने पूर्ण करावी. जिल्ह्यातील कोणताही शेतकरी हा ग्रीस्टेक नोंदणीपासून वंचित राहणार नाही याकडे लक्ष द्यावे.भविष्यात सर्व कृषी योजनांचा लाभ ग्रीस्टेक क्रमांकाच्या माध्यमातून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी जिल्ह्यात सप्टेंबर-२०२५ मध्ये अतिवृष्टी व पूर यामुळे झालेल्या शेतजमिनीच्या नुकसानीची मदत वाटपाची माहिती दिली. प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी भरलेला पिक विमा, अतिवृष्टीमुळे २१०९ विहिरींचे नुकसान झाले असून १३९७ विहिरी ह्या पूर्णतः खचून अथवा वाहून गेलेल्या आहेत व ७१२ विहिरींचे अंशतः नुकसान झाले असल्याचे सांगितले. जिल्ह्यातील विविध प्रकल्पांच्या आणि विविध विकासकामांच्या सद्यस्थितीबाबतची माहिती श्री.पुजार यांनी यावेळी दिली.

या बैठकीत उपस्थित विविध विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी त्यांच्या विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रकल्प व विकासकामांच्या प्रगतीबाबतची माहिती यावेळी दिली

# देशी विदेशी दारुच्या बाटल्या बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत गुनाजी रा. खडकी ता.कळंब जि. धाराशिव हे दि.०९.११.२०२५ रोजी कळंब ते लातुर जाणारे रोडलगत खडकीच्या पुढे हॉटेल जय मल्हारचे बाजूस अंदाजे १,२०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ३० सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : KAZI MUHAMAD AVEZUDDIN MUHAMAD SALEEMUDDIN. TO:KAZI MUHAMAD AVEZUDDIN SALIMODDIN.
Hence for this Declaration i will be known by this name and will use KAZI MUHAMAD AVEZUDDIN SALIMODDIN. in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME - KAZI MUHAMAD AVEZUDDIN MUHAMAD SALEEMUDDIN.
NEW NAME :- KAZI MUHAMAD AVEZUDDIN SALIMODDIN.
Address - KAZI PATTA, NARAYAN COLONY, SHAHU NAGAR.DIST. OSMANABAD. -413501.
Adhar no.-268618382693. Mob. No.-8983744050.


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ १ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649